IRBK-0107738

IRBK-0107738

नों. क्रं. ८८६३८

वा. वा.

2348

IRBK-0107738

IRBK-0107738

: प्रकाशक :

**म. के. कुलकर्णी**

७७३ सदाशिव पेठ, पुणें २.

◆◆

आवृत्ति १ डिसेंबर १९६०

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन )

◆◆

: मुद्रक :

**शं. त्र्यं. आवटे,**

इंदिरा प्रिंटिंग प्रेस,

२००५ सदाशिव, पुणें २.

# समर्थन

—:०:—

सुधारणावृक्षाची विचार हीं पाळेंमुळें, उच्चार ही पालवी व आचार हीं फळें होत. यामुळेंच राष्ट्रांत विचारप्रवर्तन अगर विचारपरिवर्तन करणाऱ्या विभूतींचीं चरित्रें वीरांच्या चरित्राप्रमाणेंच स्फूर्तिदायक, मार्गदर्शक व आत्मबोधक होतात. गेल्या अर्धशतकांत महाराष्ट्राच्या विचारांत क्रांति घडवून आणणारे जे थोडे थोर पुरुष होऊन गेले त्यांत आगरकर अग्रगण्य आहेत.

समुद्रावर जशा नित्य लाटा उसळत असतात, त्याप्रमाणें आगरकरांचें सर्व आयुष्य संकटांनीं व्यापून टाकलें होतें. पण वर्षाऋतूंतील काळ्याकुट्ट मेघमालेंतूनहि डोकावूं पाहणाऱ्या सूर्याच्या प्रभेप्रमाणें त्यांनीं आजन्म व आमरण जें धैर्य दाखविलें, स्वजनांच्या उन्नतीसाठीं त्यांनीं जो स्वार्थत्याग केला, समतेचा मंत्र राष्ट्राला शिकविण्याकरितां त्यांनीं जी धडपड केली, सत्य हेंच परब्रह्म मानून त्याच्या पूजनासाठीं त्यांनीं संसारसुखाचा जो होम केला, त्याला आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासांत तरी जोड मिळणार नाहीं.

गरीब विद्यार्थ्यांच्या मनांतील महत्त्वाकांक्षेचा स्फुल्लिंग फुलविणारें आणि निद्रित विचारशक्तीला जागृत करणारें हें तेजस्वी चरित्र लिहिण्याची माझी फार दिवसांची इच्छा होती. शिरोड्यासारख्या कोंकणांतील एका बाजूच्या खेडेगांवांत राहून विस्तृत चरित्राचें साहित्य गोळा करणें अशक्य असल्या-मुळें, ही इच्छा मनांतल्या मनांतच राहणार असें मला वाटत होतें.

पण इच्छा असली कीं मार्ग मिळतो या उक्तीचें प्रत्यंतर या चरित्राच्या बाबतींत मला आलें. सुमारें अडीच वर्षांपूर्वीं गणेश महादेव कंपनीचे श्री. वीरकर यांनीं एक चरित्रमाला काढण्याचें ठरवून त्यांतील कांहीं पुष्पें गुंफण्याविषयीं मला सांगितलें. या चरित्रमालेंतील चरित्रें छोटीं असल्यामुळें, त्यांत माहितीच्या पसाऱ्यापेक्षां स्फूर्तीच्या तेजाकडेच अधिक लक्ष देणें

प्रकाशन क्रमांक : २९

# आगरकर–चरित्र

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय शाखा

लेखक :
वि. स. खांडेकर

किंमत २ रुपये

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रं. क्र. ५५३८ नों. दि.
वि.

सदभिरुचि प्रकाशन
पुणें २.

: प्रकाशक :

**म. के. कुलकर्णी**

७७३ सदाशिव पेठ, पुणें २.

◆◆

आवृत्ति १ डिसेंबर १९६०

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन)

◆◆

: मुद्रक :

**शं. त्र्यं. आवटे,**

इंदिरा प्रिंटिंग प्रेस,

२००५ सदाशिव, पुणें २.

# समर्थन

—:०:—

सुधारणावृक्षाची विचार हीं पाळेंमुळें, उच्चार ही पालवी व आचार हीं फळें होत. यामुळेंच राष्ट्रांत विचारप्रवर्तन अगर विचारपरिवर्तन करणाऱ्या विभूतींचीं चरित्रें वीरांच्या चरित्राप्रमाणेंच स्फूर्तिदायक, मार्गदर्शक व आत्मबोधक होतात. गेल्या अर्धशतकांत महाराष्ट्राच्या विचारांत क्रांति घडवून आणणारे जे थोडे थोर पुरूष होऊन गेले त्यांत आगरकर अग्रगण्य आहेत.

समुद्रावर जशा नित्य लाटा उसळत असतात, त्याप्रमाणें आगरकरांचें सर्व आयुष्य संकटांनीं व्यापून टाकलें होतें. पण वर्षाऋतूंतील काळ्याकुट्ट मेघमालेंतूनहि डोकावूं पाहणाऱ्या सूर्याच्या प्रभेप्रमाणें त्यांनीं आजन्म व आमरण जें धैर्य दाखविलें, स्वजनांच्या उन्नतीसाठीं त्यांनीं जो स्वार्थत्याग केला, समतेचा मंत्र राष्ट्राला शिकविण्याकरितां त्यांनीं जी धडपड केली, सत्य हेंच परब्रह्म मानून त्याच्या पूजनासाठीं त्यांनीं संसारसुखाचा जो होम केला, त्याला आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासांत तरी जोड मिळणार नाहीं.

गरीब विद्यार्थ्यांच्या मनांतील महत्त्वाकांक्षेचा स्फुल्हिंग फुलविणारें आणि निद्रित विचारशक्तीला जागृत करणारें हें तेजस्वी चरित्र लिहिण्याची माझी फार दिवसांची इच्छा होती. शिरोड्यासारख्या कोंकणांतील एका बाजूच्या खेडेगांवांत राहून विस्तृत चरित्राचें साहित्य गोळा करणें अशक्य असल्या-मुळें, ही इच्छा मनांतल्या मनांतच राहणार असें मला वाटत होतें.

पण इच्छा असली कीं मार्ग मिळतो या उक्तीचें प्रत्यंतर या चरित्राच्या बाबतींत मला आलें. सुमारें अडीच वर्षांपूर्वीं गणेश महादेव कंपनीचे श्री. वीरकर यांनीं एक चरित्रमाला काढण्याचें ठरवून त्यांतील कांहीं पुष्पें गुंफण्याविषयीं मला सांगितलें. या चरित्रमालेंतील चरित्रें छोटीं असल्यामुळें, त्यांत माहितीच्या पसाऱ्यापेक्षां स्फूर्तीच्या तेजाकडेच अधिक लक्ष देणें

जरूर आहे हें उघड आहे. चरित्रावांचून चारित्र्य असूं शकत नाहीं हें खरें; पण देवळाच्या भव्यपणापेक्षां दैवताचें जागृतत्त्वच भक्तांना अधिक आकर्षित असतें, ही गोष्ट चरित्रग्रंथाच्या वाचकांना सांगायला नकोच. खडान्‌खडा माहिती गोळा करून एखादा पर्वत निर्माण करणें हें चिमुकल्या चरित्राचें कार्यच नव्हे. हें चिमणें वृंदावन आहे; त्यांत गोपालकृष्णाचें दर्शन वाचकांना करविणें एवढेंच लेखकाचें काम.

हें चरित्र लिहून हातावेगळें करायला आणि प्रो. आळतेकर यांनीं लिहिलेलें आगरकरांचें चरित्र प्रसिद्ध व्हायला एकच गांठ पडली. अफाट समुद्रांत प्रवास करायला जशी आगबोट, त्याप्रमाणें जिज्ञासु व प्रौढ वाचकांचें समाधान करायला विस्तृत चरित्र उपयोगी पडतें. चिमुकलें चरित्र गोमन्तकांतील खाड्यांत आढळणाऱ्या वाफोरासारखें आहे. खाडींतल्या प्रवाशाला जशी छोटी बोट उपयुक्त, तसें हें चरित्र विद्यार्थिदशेंतील तरुणांना थोडें फार उपयोगी पडलें तरी लेखकांचे श्रम सफल होतील.

नित्य कार्याच्या व्यापांतून थोडे दिवस मला मुक्त करून, हें चिमुकलें चरित्र लिहिण्याला सवड दिल्याबद्दल मी माझे स्नेही श्री. मे. द. शिरोडकर यांचा ऋणी आहें. दोन वर्षांपूर्वीं श्री. वीरकरांनीं चरित्र-मालेच्या कल्पनेला मूर्तस्वरूप देण्याचा निश्चय केला नसता तर हें पुस्तक त्या वेळीं लिहूनाहि झालें नसतें. त्यांचाहि मी अत्यंत आभारी आहें. पुस्तकाची मुद्रणप्रत तयार करणारे श्री. ज. के. राव यांचें ऋण प्रेमाचें असल्यामुळें अव्याज आहे हें हें खरें. परंतु मी त्यांचा ऋणी आहेच.

या चिमुकल्या पुस्तकांबद्दल यापेक्षां अधिक लिहिणें म्हणजे तान्ह्या मुलाच्या डोक्याला पेशवाईतील पागोटें घालण्यासारखें होईल; तेव्हां इथेंच वाचकांचा निरोप घेणें बरें.

शिरोडें
२९-२-३२

वि. स. खांडेकर

# आगरकर-चरित्र

वि. स. खांडेकर

किंमत २ रुपये

# अनुक्रमणिका

## पूर्वार्ध

| प्रकरण | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ लें | —पहिलीं सोळा वर्षें ... .... ... .... | ५ |
| २ रें | —पदवी व प्रतिज्ञा .... .... ... .... | १७ |
| ३ रें | —केवळ सत्यासाठीं ... .... ... .... | २८ |
| ४ थें | —सुधारकांचा संसार ... ... .... .... | ४० |
| ५ वें | —देव न मानणारा देवमाणूस.... ... ... | ४७ |


## उत्तरार्ध

| | | |
|---|---|---|
| १ लें | —वाङ्मय-संसार .... .... .... .... | ५८ |
| २ रें | —सामाजिक परिस्थिति .... .... .... | ६७ |
| ३ रें | —धर्मविचार ... ... ... .... ... | ७५ |
| ४ थें | —सुधारणादेवीचें दर्शन ... .... .... | ८७ |
| ५ वें | —आगरकरांचा संदेश ... .... ... | ९९ |
| | परिशिष्ट.... ... .... ... ... .... | १०९ |

# आगरकर चरित्र

## प्रकरण पहिलें

### पहिलीं सोळा वर्षें

प्रीतिसंगमाजवळच आगरकरांचा जन्म झाला. प्रीतिसंगम हें ज्यांचें आजन्म ब्रीदवाक्य होतें, पति-पत्नी, ब्राह्मण-शूद्र, जुनें-नवें, या सर्वांचा प्रेमसंगमच समाजाला सुखी करूं शकेल, हा दिव्य मंत्र ज्यांनीं महाराष्ट्राला दिला, त्या आगरकरांचा जन्म कृष्णा व कोयना यांच्या प्रीतिसंगमाजवळ व्हावा ही गोष्ट निसर्ग-नाटकांतील पताका-स्थानाप्रमाणें वाटते. महाबळेश्वराहून एकलकोंडेपणानें निघून स्वतःचीं दुःखें आंतल्या आंत गिळून आयुष्याचा प्रवास करणाऱ्या कृष्णा-बाईच्या अंतरंगांत कोयना कऱ्हाडला शिरते. आपल्या जन्मग्रामा-जवळील हें हृदयमीलनाचें व समरसतेचें दृश्य पाहूनच निष्प्रेम जीवन कंठणाऱ्या विधवा, निर्माल्याप्रमाणें समाजानें दूर फेंकून दिलेले अस्पृश्य, वहाणांप्रमाणें पदोपदीं पायाखालीं तुडविल्या जाणाऱ्या बायका, या सर्वांच्या हृदयांत कोयनेप्रमाणें प्रवेश करावा, त्यांचीं सुखदुःखें जाणून घ्यावीं, त्यांच्या जीवनाचा मार्ग निष्कंटक करावा, अशी आगरकरांना स्फूर्ति झाली असेल काय ? आपलें विद्याधन इतरांच्या उपयोगासाठीं आहे, हा धडा ते कृष्णा व कोयना यांच्या परोपकाराच्या व्रतापासूनच शिकले असतील काय ? त्यांचीं पल्लेदार वाक्यें पावसाळ्यांत दुथडी

भरून चाललेल्या कृष्णाबाईवरील लाटांप्रमाणें असतात. निर्बुज समाजाला कार्यप्रवृत्त करण्यासाठीं त्यांच्या अंगांत संचारलेला आवेश ऐन पुरांतील कृष्णाबाईच्या तांबड्यालाल पाण्याची आठवण करून देतो. लहानपणीं कृष्णाबाईंत पोहतां पोहतां त्यांनीं जे हात मारले ते आपल्या गुरुमाउलीच्या मांडीवर लोळत लेखनाचें वळण गिरविण्याकरतांच होते काय ? कुणीं सांगावें ? आगरकरांच्या पावलांचा स्पर्श झालेले वाळूचे कण कऱ्हाडच्या वाळवंटांत अद्यापिहि असतील; कृष्णाबाईला साक्षी ठेवून स्वार्थत्यागाची त्यांनीं केलेली प्रतिज्ञा ज्यांनीं ऐकली, असे देवाल्याचे दगड कृष्णाबाईच्या तीरावर अद्यापिहि असतील; पण या वाळूच्या कणांची आणि दगडांची भाषा सामान्य मनुष्याला समजणार नाहीं. ती जाणण्याला कवीचें हृदयच पाहिजे.

कऱ्हाडपासून तीन मैलांवर असलेल्या टेंभू गांवांतील आगरकरांच्या घरांत १८५६ सालीं एक बालक पाळण्यांत पडलें होतें. बारशादिवशीं आईबापांनीं व आप्तांनीं त्याचें गोपाळ असें नांव ठेवलें. महाराष्ट्राच्या भावी इतिहासाच्या अधिष्ठात्री देवतेनें तर या बालकाचे वडील गणेशपंत यांना हें नांव ठेवण्याची स्फूर्ति दिली नसेल ना ? पाळण्यांतलें तें बालक टक लावून वर पहात कसला विचार करीत आहे, याची त्याच्या आईला कल्पनाहि झाली नसेल. द्वापारयुगीं भगवान् श्रीकृष्णानें प्रथम गो-पालन करून नंतर गीता सांगितली; या कलियुगांत गीता आधीं सांगितल्याखेरीज व्यापक उपदेश कुणालाहि पटणार नाहीं, असा विचार कदाचित् त्या बालकाच्या मनांत येत असेल. दोनशें वर्षांपूर्वी श्रीशिवछत्रपतींनीं गाईच्या रक्षणाकरतां भवानी तलवार उपसली; यापुढें तें काम लेखणीनेंच केलें पाहिजे असेंहि त्याला वाटत असेल. भविष्यकाळ भूतकाळच्या भांडारांत जमा झाला म्हणजे अशा किती तरी कल्पना सुचूं लागतात. १८५६ सालीं टेंभू गांवीं पाळण्यांत पडलेला गोपाळ वर टक लावून पहात होता

याचें कारण लहान मुलें तसेंच करतात हेंच असण्याचा अधिक संभव आहे. त्याची वळलेली मूठ बालस्वभावदर्शक होती. पुढें या झांकलेल्या मुठींतूनच राक्षसी रूढींचा संहार करणारीं अस्त्रें बाहेर पडलीं हा भाग निराळा !

थंडीनें झाडांचीं पानें पुरीं गळून पडण्यापूर्वींच काजूचीं झाडें व आंबे मोहरूं लागतात; रात्रीचें राज्य संपण्यापूर्वींच दिशा उजळतात. हिंदुस्थानच्या भवितव्याची स्थितीहि अशीच आहे. अठराव्या शतकाबरोबरच मराठी राज्याचा शेवट झाला असें म्हणावयास हरकत नाहीं. मृत्युशय्येवर पडलेल्या मनुष्याचे आंचके ह्या जशा त्याच्या मृत्यूबरोबर चाललेल्या युद्धांतील विजयाच्या गर्जना नव्हेत, त्याप्रमाणें वसईच्या तहानंतर मराठ्यांनीं इंग्रजांबरोबर केलेल्या लढाया हीं कांहीं त्याच्या स्वतंत्र राज्यश्रीचीं मंगल गीतें नव्हती. सातासमुद्रापलीकडून आलेल्या बनियांनीं मराठ्यांना पुरें बनविलें व १८१८ त महाराष्ट्रांतील ब्राह्मणांनीं राज्यसूत्रें टाकून पोथ्यापुस्तकें आणि क्षत्रियादि इतर वर्णांनीं तरवारींचा त्याग करून विळेकोयते पुनः हातीं घेतले. इंग्रजांनीं सफाईनें विझवून टाकलेल्या या स्वातंत्र्याग्नींतील एक निखारा वाऱ्यानें फुलला व त्यानें १८५७ सालीं थोडासा भडका उडवून दिला. या निखाऱ्याचा तादृश उपयोग व्हावयाचा नव्हता म्हणूनच कीं काय, स्वातंत्र्यदेवतेची प्रतिष्ठा करण्याला समर्थ असलेले दोन देवदूत ईश्वरानें १८५६ सालींच महाराष्ट्रांत पाठवून दिले होते. त्यांतील गोपाळ कऱ्हाडच्या प्रीतिसंगमापाशीं सामाजिक पारतंत्र्य नाहींसें करण्याकरतां अवतरला होता व दुसरा बाळ रत्नागिरींत समुद्राच्या लाटांचें स्वातंत्र्यगीत ऐकून देशाच्या राजकीय शृंखला तोडून टाकण्याकरतां आला होता. आगरकरांच्या जन्मकाळीं लोकहितवादी रूढीनें आंधळ्या झालेल्या लोकांच्या डोळ्यांत चरचरीत अंजन घालीत होते, रानडे इंग्रजी शिक्षण घेत होते, आणि चिपळूणकर मराठी शाळेंत जात होते.

आगरकरांसारखें अमृतफळ ज्या वंशवृक्षाला लागलें त्याच्याविषयीं कोणालाहि कौतुकच वाटेल. सामान्य वृक्षांचे कुठलेच नियम वंशवृक्षाला लागू पडत नसल्यामुळें त्याचीं पाळेंमुळें, पुढें त्याला फुटलेल्या फांद्या, वगैरे गोष्टींचा नकाशा काढून फारसा फायदा होत. नाहीं एवढें सांगितलें म्हणजे पुरे कीं, आगरकरांचे पणजे बच्चाजीपंत यांच्या डोक्यावर लक्ष्मीचा वरदहस्त होता; बच्चाजीपंतांचें चिरंजीव विष्णुपंत यांच्या कारकीर्दींत तिची मर्जी बिनसून ती या कुटुंबाकडे उदासीनपणानें पाहूं लागली; आणि आगरकरांच्या आजोबांकडून वडिलांकडे जेव्हां घरचा कारभार आला, तेव्हां तर ती या कुटुंबाकडे पाठ फिरवून निघून गेली. सुभाषिताच्या दृष्टीनें तिचेंहि करणें बरोबर होतें. आगरकरांच्या वडिलांचें नांव होतें गणेशपंत. कऱ्हाडच्या विष्णुपंत भागवतांच्या मुलीचें पाणिग्रहण गणेशपंतांनीं करतांच देवादिकांतील नांवाच्या सनातन नियमाप्रमाणें ती सरस्वती झाली. घरांत सरस्वती आल्यावर, सर्व कवींचा सल्ला घेऊनच कीं काय, लक्ष्मीनें तेथून आपला गाशा गुंडाळला. या जन्मजात दारिद्र्यानें आगरकरांचा पाळण्यापासून चितेपर्यंत पाठपुरावा केला खरा. पण सर्व दृष्टींनीं सरस्वतीचा पुत्र असणाऱ्या मनुष्याचा दारिद्र्य हा जन्मसिद्ध हक्कच होत नाहीं काय?

गरुड व उंदीर यांच्यांत जेवढें अंतर, तेवढेंच आगरकरांचे आजोबा विष्णुपंत आणि वडील गणेशपंत यांच्या परिस्थितींत पडलें. तथापि जनाची श्रीमंती नसली तरी मनाची श्रीमंती ते व त्यांच्या पत्नी सरस्वतीबाई यांच्या ठिकाणीं विपुल होती. ऐहिक संपत्ति सांठवणीच्या पाण्याप्रमाणें असते. ती पुरून पुरून किती दिवस पुरणार? उलट मनाच्या ऐश्वर्याची गोष्ट या संपत्तीपेक्षां सर्वस्वीं निराळी असते. विद्याधनाप्रमाणें तें चोर, राजा वगैरे सर्व जबरदस्त लुटारूंना पुरून उरतें. गणेशपंत व सरस्वतीबाई यांच्याकडून इतर दागिने नसले तरी सच्छीलाचा अलंकार आगरकरांना मिळाला. चांदीच्या बोंडल्यानें दूध पिण्याचें भाग्य

लाधलें नाहीं, तरी साधेपणाचें व सरळपणाचें बाळकडू त्यांना जन्मदात्यांनीं पाजलें. सरस्वतीबाईंना कविता करण्याचा नाद असून तत्कालीन समाजस्थितीला अनुसरून त्यांनीं देवादिकांवर कांहीं गाणींहि केलीं होतीं. या मानसिक गुणाबरोबर एक अत्यंत त्रासदायक रोगहि आगरकरांच्याकडे आनुवंशिक रीतीनें आला. त्यांच्या आईला ( कित्येक म्हणतात वडिलांना ) असलेल्या दम्यानें दारिद्र्याप्रमाणें त्यांची आमरण पाठ पुरविली. दारिद्र्याग्नीची आंच थोडी असते म्हणून विधि असल्या रोगांचें शुक्लकाष्ट महात्म्यांच्या मागें लावीत असतो काय? कदाचित् त्याला त्यांच्या खडतर तपश्चर्येची परीक्षाच पहावयाची असेल.

गोपाळरावांना आणखी पांच भावंडें होतीं. सहा मुलांच्या जबाबदारीचा भार घेऊन संसारशकट हांकणें गणेशपंतांना किती कठिण झालें असेल याची कल्पनाहि करवत नाहीं. पैशाचें ओंगण नसलें कीं संसारशकटाचीं चक्रें चालेनाशीं होतात. पति-पत्नींना या शकटाला जुंपून निर्दय दैव चाबकाचे फटकारे लगावीत असतें व निराश मनानें आणि जड पावलांनीं तीं तो शकट ओढीत असतात. कऱ्हाडला गोपाळरावांचें आजोळ सुस्थितींत होतें म्हणून बरें; नाहीं तर महाराष्ट्राच्या हृदयमंदिरांत सत्याच्या मूर्तीपुढें आपला ज्ञानदीप अखंड प्रज्वलित ठेवणाऱ्या गोपाळरावांची व विद्येची कदाचित् धूळभेटहि झाली नसती.

सरस्वतीची उपासना करण्याकरितां बाळपणांतच आईबापांना सोडून गोपाळरावांना कऱ्हाडला रहावें लागलें. नदीचा उगम गिरिशिखरावर झाला तरी तिचा प्रवास मैदानांतूनच होतो. कऱ्हाडला आईच्या आठवणीनें येणाऱ्या अश्रूंनीं गोपाळरावांचे डोळे किती तरी वेळां भरून गेले असतील. इतर मुलें आपल्या आईला बिलगतात त्याप्रमाणें आपल्याला शाळा सुटतांच घरीं धांवत जाऊन आईला मिठी मारतां येत नाहीं, म्हणून ते किती तरी वेळां उदास झाले असतील.

रात्रीं त्यांचा बालदेह कऱ्हाडला घरीं बिछान्यावर असला, तरी त्यांतील प्रेमळ आत्मा तीन मैलांवर असलेल्या टेंभूमध्यें जाऊन आईबापांशीं गुजगोष्टी करीत बसत असेल. फूल पुरतें उमललें म्हणजे तें वेलीपासून आपोआपच दूर होतें. गोपाळरावांची स्थिति तशी नव्हती. ही बाळकळी, देंठ दुखावला तरी हरकत नाहीं अशा निश्चयानें, मातापितरांच्या लतातुल्य बाहुपाशांचा मोह सोडून विद्यादेवीच्या पायावर येऊन पडली होती.

इ. स. १८६८-६९ पर्यंत कऱ्हाडचा व गोपाळरावांचा ऋणानुबंध टिकला. या अवधींत बरोबरीचे मामा दत्तोपंत यांच्या जोडीनें त्यांनीं मराठी सहा यत्तांचा अभ्यास पुरा करून इंग्रजी तीन यत्ता संपविल्या. बाल्यावस्था ही एक प्रकारची समाधि आहे. बाल्ययोग्याला स्वतःची गरिबी अगर श्रीमंती जाणवत नाहीं, जगाच्या रुक्ष व्यवहाराची कल्पना येत नाहीं, आणि 'उद्यां काय ?' हा प्रश्नहि त्याला भेवडावीत नाहीं. भोंवतालीं रम्य वनश्री असो अगर नसो, निर्झर जसा नाचतच रहातो, आम्रासव प्यायला मिळो अगर न मिळो, वसंताच्या रम्य दर्शनानेंच कोकिळा जशी अखंड गात असते, अंतरंगांत जल असो वा नसो, मेघ जसे सायंकालीन सूर्यकिरणांनीं रंगून जातात, त्याप्रमाणें बालकाचें मन दारिद्र्य, दैन्य, दुःख या सर्व दाहक गोष्टींपासून अलिप्त राहून नेहमीं आनंदानें बागडत असतें. कऱ्हाडच्या वास्तव्यांत गोपाळरावांचें मनहि असेंच होतें; म्हणूनच ते पोहण्यांत पटाईत झाले. ज्यांत कांहीं तरी धाडस अगर कौशल्य आहे, असे खेळ खेळण्याची या वेळीं त्यांना जबरदस्त हौस असावी. दम्यासारखा ब्रह्मराक्षस मानगुटीला बसल्यामुळें, त्यांची ही खेळाची हौस दरिद्र्याच्या मनोरथांप्रमाणें मनांतल्या मनांतच राहिली. पण म्हणतात ना, गवयाला डॉक्टरनें बोलायचीहि बंदी केली, तरी तो मधून एखादा चरण स्वतःशीं गुणगुणणारच. मृत्यूपूर्वी अवघीं दोनच वर्षें 'सणांचा व खेळांचा ऱ्हास' या नांवाचा एक

लेख त्यांनीं लिहिला आहे. त्यांत ते म्हणतात, 'कोणत्याहि देशांतील लोकांस नाना प्रकारचे व्यायामशील खेळ खेळण्याची हौस असणें व तसले खेळ खेळणाऱ्या लोकांची मोठी संख्या त्यांत दृष्टीस पडणें हें त्या देशाच्या सुस्थितीचें फार मोठें व्यंजक आहे.' कशामुळेंहि असो, आमच्यांतला खेळाडूपणा व हौशी वृत्ति लोप पावत चालली आहे हें फार वाईट आहे असें त्यांना वाटे. जग हें कंटकपूर्ण उद्यान असेल; पण आपण फुलपांखरें होऊन त्यांतील फुलें शोधून काढलीं पाहिजेत व त्यांतील रस आपल्या पदरांत कसा पडेल हें पाहिलें पाहिजे.

पोहणें व हरतऱ्हेचे खेळ यांच्या सहाय्यानें त्यांनीं जशी शरीर-संपत्ति कमाविली, त्याप्रमाणें लेखन व वक्तृत्व यांतहि आपली गति करून घेऊन त्यांनीं आपल्या बुद्धिसंपदेंत भर घालायला सुरुवात केली. मुलाचे पाय पाळण्यापेक्षां शाळेंतच स्पष्ट दिसतात. गोपाळरावांना अवघ्या बारा वर्षांच्या आंत निबंध लिहिण्याची हौस उत्पन्न व्हावी ही गोष्ट याच तत्त्वाची द्योतक आहे. अशा रीतीनें गोपाळरावांनीं बाराव्या वर्षापर्यंत शरीर व बुद्धि हीं दोन्ही जेवढीं संपन्न करतां येतील तेवढीं केलीं. पण त्यांच्या शिक्षणाची आगगाडी इंग्रजी तिसरीच्या स्टेशनावर थांबली ती थांबलीच. कऱ्हाडला पुढील यत्ता नव्हत्या. पुण्याला जाऊन शिकायचें म्हणावें, तर पैसा आणयाचा कुठून ? भिकाऱ्याला राजकन्या जितकी दुर्लभ तितकीच आपल्याला विद्या दुःसाध्य असा विचार त्या वेळीं गोपाळरावांच्या मनांत खास आला असेल. विद्यागिरीच्या पायथ्या-पासून ते थोडेसे वर आले नाहींत, तों दारिद्र्य-राक्षस वाट अडवून बसलेला ! पुढें जायचें कसें ? बरोबरीनें शिकणारे मामा, थोरल्या बंधूंची मदत असल्यामुळें पुण्याला निघून गेले; आणि गोपाळराव ? त्यांच्या मनाची त्या वेळीं काय स्थिति झाली असेल ? बरोबरीच्या मैत्रिणीच्या मुलाच्या बारशाला गेलेल्या बालविधवेलाच त्यांच्या दुःखाची कल्पना

करतां येईल. अश्रुपूर्ण नेत्रांनीं गोपाळरावांनीं विद्यामंदिराला रामराम ठोकला व पोटाकरितां कऱ्हाडच्या मुन्सफकोर्टांत ते उमेदवार झाले.

उमेदवार* हा शब्द मोठा फसवा. त्या शब्दांतली उमेद प्रत्यक्ष अनुभवाला कधींच येत नाहीं. ओसरीवर सहज बसूं दिलेलें कुत्रें व पाळलेलें कुत्रें यांत जेवढा फरक, तेवढाच उमेदवार व कारकून यांच्यांत असतो. आज ना उद्यां आपण कारकून होऊं या आशेवर उमेदवाराला काळ कंठावा लागतो. महाराष्ट्र-शारदेच्या कंठांतील एका तेजस्वी हिऱ्याला केवळ दारिद्र्यामुळें वयाच्या तेराव्या वर्षीं मुन्सफकोर्टांत कारकुनीच्या चुलींत कोळसा म्हणून जळावें लागलें ही गोष्ट अद्यापिहि हृदयभेदक वाटते. मग प्रत्यक्ष त्या आगीचे चटके ज्यांच्या अंगाला बसले त्या आगरकरांची काय स्थिति झाली असेल ? लेखक म्हणून आमरण कागदलेखणीशीं त्यांनीं संबंध ठेवला हें खरें; पण निर्जीव कारकुनी-लिखाण व जिवंत प्रतिभेचें वाङ्मय यांत गवळ्याचें दूध व स्वर्गांतील अमृत यांच्याइतका फरक आहे. गढूळ पाण्याच्या डबक्यांत पोहण्याचा आनंद कसला ? बैठकीच्या गवयाला भिक्षा मिळविण्यासाठीं दारोदार रामदासी श्लोक म्हणण्याची पाळी आली तर त्यापासून त्याला सुख कसें होणार ? सारा अरण्यप्रान्त निनादित व भयभीत करून सोडणाऱ्या वनराजाला सर्कशींतल्या पिंजऱ्यांत कोंडला म्हणजे मेघगर्जनेला लाजविणारी त्याची वाणी मुकी होते.

कऱ्हाडच्या मुन्सफकोर्टांत आगरकर हातानें अर्ज खरडीत होते खरे ; पण त्यांचें मन मात्र तिथेंच रखडत नव्हतें. अशोकवनांत राक्षसिणींच्या पहाऱ्यांत बसलेली सीता मनानें जशी अरण्यांतील राम-

---

*हीं उमेदवारी त्यांनीं रत्नागिरीहून परत आल्यावर केली अशी माहितीहि कांहीं चरित्रांत मिळते.

चंद्राबरोबर होती, त्याप्रमाणें कारकूनखान्यांत गोपाळरावांचें शरीर दिसलें, तरी त्यांचें मन विद्येच्यामागें धांवत सरस्वतीमंदिरांत प्रवेश करीत होतें. अंतःस्फूर्ति ही दिव्य शक्ति आहे. ती पर्वतप्राय अडचणी ओलांडते, क्षुब्ध सागरावरून लीलेनें नृत्य करीत जाते आणि संकटांच्या भुतांचा आपल्या मंत्रांनीं जागच्याजागीं बंदोबस्त करून ती प्रगतीचा मार्ग आक्रमीत असते. आगरकरांच्या महात्त्वकांक्षेला पालवी फुटली व दगडाप्रमाणें कारकुनींत जन्मभर पडून रहाण्याचा विचार दूर झुगारून ते रत्नागिरीला जाण्याकरितां निघाले.

रत्नागिरीला * त्यांचे कोणी नातलग होते. विद्यार्जनाच्या कामीं त्यांचा आपल्याला फार उपयोग होईल अशी गोपाळरावांना आशा होतीं. कऱ्हाडहून ते रत्नागिरीला जाण्याकरितां निघाले, तेव्हां कऱ्हाड येथें मुन्सफ असलेल्या नागपूरकर नांवाच्या गृहस्थानीं त्यांना पाऊणशें रुपये मदतीदाखल दिले. आपल्या तळमळीचें कौतुक करणारें एक तरी अंतःकरण त्यांना दिसलें. प्रयत्नान्तीं परमेश्वर भेटतोच भेटतो असें गोपाळरावांना नागपूरकरांचे पैसे पाहतांच खास वाटलें असेल. पण ही त्यांची परमेश्वरावरील श्रद्धा रत्नागिरी गांठेपर्यंतच टिकली असावी. ज्या आप्तांच्या आशेवर त्यांनीं कऱ्हाडहून रत्नागिरीपर्यंत पायपीट केली, त्यांनीं फुकाची सहानुभूतीदेखील गोपाळरावांना दर्शविली नाहीं. पोहतां न येणारानें भोपळ्याच्या बळावर पोहायला पडावें आणि तो भोपळा फुटून भ्रमाचा ठरावा अशांतली अवस्था झाली! गोपाळरावांच्या जागीं दुसरा कोणी असता तर त्यानें वैतागानें रत्नागिरीच्या समुद्रांत जीव दिला असता, अगर आपण ज्या वेगानें पाठ-

* त्यांचे चुलते रत्नागिरीला डेप्युटी इन्स्पेक्टर होते. ते एकाएकीं वारल्यामुळें गोपाळरावांना रत्नागिरीहून परत यावें लागलें असें कै. महाजनी म्हणतात.

लाग करीत आहों, त्याच्या दुप्पट वेगानें पुढें धांवणाऱ्या विद्येच्यामागें लागण्यांत मतलब नाहीं, असा पोक्त विचार करून परत कऱ्हाडचा रस्ता सुधारला असता. पण संकटाच्या वाऱ्यानें विझून जावयाला गोपाळरावांची महत्त्वाकांक्षा म्हणजे कांहीं पळीभर तेलाच्या आधारावर मिणमिण करणारी पणती नव्हती; ती आकाशांतली विजली होती. माघार हा शब्दच गोपाळरावांच्या कोशांत नव्हता. आठवड्यांतील सातहि दिवस जेवायला घालणारा एक आप्त दुर्दैवानें विन्मुख झाला म्हणून त्यांनीं हातपाय गाळले नाहींत. एक एक दिवस जेवायला घालणारे सात दूरचे लोक त्यांनीं जवळ केले व ते विद्यासंपादनाला लागले. प्रसंगीं दुसऱ्याचीं धोतरें धुण्याचा शागीर्दपेशाहि त्यांनीं अंगीकारला. "विद्यार्थी वा त्यजेत् सुखम्' हें सुभाषित त्यांनीं आपल्या दररोजच्या कार्यक्रमांत पूर्णपणें अंमलांत आणलें.

पण वार लावून व काम करून पोटाची सोय लावणें आणि विद्या करणें या दोन्ही गोष्टी त्यांना इष्ट असल्या तरी, ज्यांच्या घरीं ते जेवीत होते त्यांना त्या सोईस्कर नव्हत्या. वारकरी विद्यार्थी म्हणजे अन्नावारी ठेवलेला ब्राह्मण बाळगडी, अशी समजूत अनेक ठिकाणीं आढळते. संकुचित दृष्टीच्या बायका व त्यांच्या मुठींत राहणारे नवरे, यांना वारकऱ्याच्या दुःखाची व ध्येयाची कल्पना कुठून येणार? दारांत येणाऱ्या भिकाऱ्याला आपण मूठभरच भिक्षा घालतों; मग पोटभर जेवणाऱ्या या पोराकडून चोपून काम करून घ्यायला काय हरकत आहे, अशी अनेक वार देणारांची प्रामाणिक समजूत असते. दुर्दैवानें असले 'समजूतदार' लोकच गोपाळरावांच्या वांट्यांला आल्यामुळें, आपल्या आश्रयदात्यांना 'वार नको पण काम आवरा' असें म्हणण्याची त्यांना पाळी आली. आपल्या हातून आवडत्या विद्यादेवीची सेवा होण्याऐवजीं वार देणाऱ्या लब्धप्रतिष्ठितांचीच सेवा होत आहे हें लक्षांत येतांच, जितक्या त्वरेनें ते रत्नागिरीला आले होते तितक्याच

त्वरेनें त्यांनीं रत्नागिरी सोडली. या वेळीं त्यांच्या जवळजवळ पांच यत्ता झाल्या होत्या.

पण कऱ्हाडला परत गेल्यावर करावयाचें काय, हा प्रश्न एखाद्या ब्रह्मसमंधाप्रमाणें त्यांच्या बालमनापुढें उभा राहिला. इतर सर्व प्रकारचे आनंद श्रीमंतांना खुशाल लाभोत; पण विद्येचा आनंद तरी गरिबांना या जगांत मिळावा, अशा प्रकारचे कितीतरी विचार या वेळीं त्यांच्या मनांत आले असतील. कांहीं तरी करायचें म्हणून दवाखान्यांतील कंपाउंडरची* नोकरी त्यांनीं पत्करली. सामाजिक रोगांचें अचूक निदान करणारा, बंधनांनीं मृतप्राय झालेल्या समाजाला स्वातंत्र्यसंजीवनी पाजणारा हा थोर पुरुष कऱ्हाडच्या दवाखान्यांत बाटल्या धूत व भरीत बसूं लागला. पुढें सामाजिक प्रश्नांचा खल करणाऱ्या प्रतिभा-संपन्न निबंधकाराला या वेळीं औषधें खलीत बसावें लागलें. 'विधिरहो बलवान्' असें म्हटल्याखेरीज या विधिघटनेचा उलगडा कसा होणार ?

पण विद्यामृताची गोडी कोयनेलांत कुठून येणार ? कालिदास व भवभूति यांच्या काव्योद्यानांतील सुगंध लुटण्याकरतां उत्सुक झालेल्या गोपाळरावांच्या मनाला औषधांचा उग्र दर्प घेत बसणें कसें आवडणार ? महाराष्ट्रीय समाजाच्या मानसिक रोगांची बिनचूक चिकित्सा करण्याचें कार्य देवाधिदेवानें ज्याच्याकडे सोंपविलें होतें, तो डॉक्टराच्या कागदा-प्रमाणें औषध देत, एखाद्या लहान गांवांतील दवाखान्यांत स्वतःला कोंडून घेईल हें शक्यच नव्हतें. गोपाळरावांनीं कंटाळून ही नोकरी सोडली. इतके दिवस त्यांच्याकडे निर्दयपणानें पाठ फिरविणाऱ्या दैवाला,

---

* ही नोकरी सोडण्याचें कारण प्रेतांची चिरफाड पाहून आलेली शिसारी हें होतें, असें कै. महाजनी यांच्या आठवणीवरून दिसतें.

आपल्या कठिण कसोटीला हा आत्मा पुरा उतरला असें वाटल्यामुळेंच कीं काय, त्यांच्याविषयीं दया उत्पन्न झाली आणि त्यानें सस्मित दृष्टीनें त्यांच्याकडे पाहिलें. त्यांचे एक मामा अकोल्याला होते. अकोल्याला ते बिऱ्हाड करणार होते. त्यांच्या बायकोबरोबर सोबत म्हणून कुणी तरी जावयाला पाहिजेच होतें. अकोल्याला हायस्कूल असल्यामुळें गोपाळराव हें काम करावयाला तयार झाले. दुर्दैवाबरोबर झुंजून हताश झालेल्या गोपाळरावांना अकोल्याला जाण्याची आलेली संधि तृषाकुल मनुष्यावर होणाऱ्या सुधावृष्टीप्रमाणें वाटली असेल यांत संशय नाहीं.*

• • •

* अकोल्याला जाण्यापूर्वीं गोपाळराव पुण्याला आपल्या मामाकडे विद्यार्जनाच्या हेतूनें गेले होते व तेथून ते मामाबरोबर अकोल्याला गेले, अशीहि माहिती एका चरित्रांत मिळते.

# प्रकरण दुसरें

## पदवी व प्रतिज्ञा

सुईच्या नेढ्यांत दोरा ओंवण्याला त्रास पडतो. एकदां दोरा ओंवला कीं झपाझप टांके घालतां येतात. जगांत संधि साधण्याच्या बाबतींतहि हाच अनुभव येतो. अकोल्याच्या मामांच्या कुटुंबाबरोबर सोळाव्या वर्षी गोपाळराव शिक्षणाच्या उद्देशानें अकोल्याला गेले. चिपळूणकरांचे समकालीन श्री. विष्णु मोरेश्वर महाजनि हे त्या वेळीं अकोलें-हायस्कूलांत शिक्षक होते. त्यांनीं गोपाळरावांचें वर्णन पुढें दिल्याप्रमाणें केलें आहे. ' अंगयष्टि उंच, सडपातळ व काटक होती. डोळे पाणीदार होते. भाषण ठसक्याचें व आत्मप्रत्ययानें मुसमुसलेलें असें होतें. स्वभाव मनमिळाऊ, लोकांच्या उपयोगी पडणारा असा होता. बुद्धि चपल व ग्राहक होती. स्मृति मध्यमावर. शब्दांपेक्षां अर्थाकडे लक्ष फार. वेळ फुकट दवडायचा नाहीं असा निश्चय. ' अवघ्या सोळाव्या वर्षी गोपाळरावांनीं आपल्या गुणांची गुरूवर इतकी छाप पाडली होती. बालसूर्याचें तेज पौर्णिमेच्या पूर्णचंद्राहूनहि अधिक हेंच खरें.

' नकटीच्या लग्नाला सत्राशें विघ्नें ' ही म्हण अकोल्याला आल्यावरहि गोपाळरावांच्या अनुभवाला आली. मनुष्य उद्योगाची नौका तयार करील, तिला उत्साहाच्या शिडाची जोड देईल; पण भाग्यसरितेंत पाणीच नसलें तर नौका चालणार कशी ? गोपाळराव अकोल्याला आल्यानंतर लवकरच त्यांच्या मामींची आई आजारी पडली. दृष्टभेट तरी व्हावी म्हणून तिनें आपल्या मुलीला निकडीनें बोलाविलें. मामींच्याबरोबर सोबत म्हणून कोणी तरी जाणें आवश्यक होतेंच. गोपाळरावांवरच ती पाळी आली. मामींना पोंचवून परत यायचें असतें तर अभ्यासाचे दिवस बुडाल्याबद्दल

गोपाळरावांना फारसें वाईट वाटलें नसतें. पण बोटावरचा वार पोटावर व्हावा, त्याप्रमाणें मामींच्या जाण्यामुळें अकोल्याचें बिऱ्हाडच डळमळूं लागलें. मामा सदाशिवरावतात्या हे लोकलफंड ओव्हरसियर असल्यामुळें बहुधा फिरतीवर असत. बायको माहेरीं गेल्यावर एकट्या भाच्यासाठीं बाई अगर ब्राह्मण ठेवणें त्यांना शक्य नव्हतें. ' तूं आतां कऱ्हाडासच रहा ' असें त्यांनीं गोपाळरावांना सांगितलें. भाग्याच्या भरतीची लाट आली न आली, तोंच अनपेक्षितपणें पुन्हां ओहोटी सुरू झाली. ओहोटीच्या ओटीनें निराशेच्या सागरांत बुडून जाण्याइतके गोपाळराव लेचेपेचे नव्हते. महाजनी मास्तरांकडून शिफारसपत्रें घेऊन पुण्याला जाण्याचें त्यांनीं ठरविलें. विद्येच्या माहेरघरीं तरी आपल्यासारख्या विद्यार्थ्याला तिची निर्विघ्न आराधना करतां येईल असें त्यांना वाटलें. पण चातकानें मेघाकडे जलाच्या अपेक्षेनें पहावें व त्यांतून विजेचा लोळ मात्र बाहेर पडावा, असा त्यांना अनुभव आला. महाजनींच्या पुण्यांतील स्नेह्यांनीं, पुण्यांतली धर्मबुद्धि म्हणजे शुद्ध वळवाचा पाऊस, त्याच्या भरंवशावर एखाद्या विद्यार्थ्यानें आपल्या आकांक्षांची पेरणी करणें धोक्याचें आहे, असा सल्ला दिला, दरिद्रि गोपाळरावांचा पुण्याला जाण्याचा मनोरथ जागच्या-जागींच राहिला.

या वेळीं महाजनींनीं मामा-भाच्यांची दिलजमाई केली व गोपाळरावांचें शिक्षण पुढें सुरू झालें. ' गोपाळरावांचा हूड स्वभाव व वडिलांचा मान ठेवण्यांत ढिलाई पाहून तात्या त्यांवर रागावले होते; व ते स्वतः लोकांच्या कामीं पडणारे असत, तरी गोपाळरावांना या वेळीं मदत करण्याला नाराज होते. ' असें महाजनि म्हणतात. महाजनींनींच गोपाळरावांचा स्वभाव मनमिळाऊ असल्याची साक्ष दिली आहे. मग या मनमिळाऊ मुलाचा उदार मामा त्याला मदत करायला नाखूष होता याचा अर्थ काय ? मानवी मनःसृष्टींतील हा एक चमत्कार आहे. धूमकेतूप्रमाणें गैरसमज अशुभ असतात व अकारण उत्पन्न होतात. याचमुळें परक्यांशीं फुलाप्रमाणें

वागणारा मुलगा आम्हांना कांट्यासारखा वाटतो! गोपाळरावांच्या बाबतींतहि बहुधा असेंच झालें असावें. सोळा वर्षांच्या भाच्याचा आत्मविश्वास मामांना अहंकारासारखा भासला असेल. सत्यनिष्ठेमुळें त्याच्या तोंडांतून बाहेर पडणाऱ्या स्पष्टोक्तीची त्यांनीं उर्मटपणांत गणना केली असेल. पंख फुटलेल्या पिलाला आकाशाची व त्यांतील संकटांची कल्पना नसल्यामुळें, तें आपल्या घरट्याकडे तुच्छतेनें पाहूं लागतें. अननुभवी तरुणांचेंहि असेंच होतें. पण पर्वतपठारावर खळखळ करणारा व वेगानें धांवणारा नदीचा प्रवाह मैदानांतून वाहूं लागतांच निःशब्द व संथ होतो, हें वडील माणसें अनेकदां विसरतात, व त्यामुळेंच एका रक्ताचीं माणसें एकमेकांविषयीं बेफिकीर बनतात! गोपाळरावांच्या मामांचा त्यांच्याविषयींचा उदासीनपणा महाजनींच्या मध्यस्थीमुळें व संकटाच्या महापुरापुढें लव्हाळ्याप्रमाणें मान वांकविण्याचा समंजसपणा गोपाळरावांनीं दाखविल्यामुळें नाहींसा झाला. मामा एकटे असले म्हणजे स्वतः स्वयंपाक करीत. गोपाळरावांनीं तीच दीक्षा घेतली व त्यांच्या अभ्यासाचें गाडें पुढें चालू लागलें.

गोपाळरावांच्या वर्गांत दहापेक्षां अधिक मुलें नव्हतीं. त्यांचा नंबर वर्गांत नेहमीं वर असे, हें सांगण्याची जरूरीच नाहीं. त्या वेळीं वऱ्हाडांतील हायस्कुलांत मराठी शिष्यवृत्तीची परीक्षा होती. या परीक्षेचें आमिष असल्यामुळें, बुद्धिमान् विद्यार्थ्यांकडून साहजिकच अभ्यासक्रमाबाहेरील मराठी गद्य व पद्य पुस्तकांचें काळजीपूर्वक अध्ययन होई. गोपाळरावांना ही मराठी शिष्यवृत्ति दोन वर्षें मिळाली. शाळेंत गोपाळरावांचे आवडते विषय संस्कृतवाङ्मय व इतिहास हे होते. त्यांच्या निबंधांतून आढळून येणारी काव्याची त्रुटित चमक संस्कृतसाहित्याच्या आवडीमुळेंच उत्पन्न झाली, असें म्हणावयाला हरकत नाहीं. संस्कृत व्याकरणाचा मात्र त्यांना कंटाळा असे. आणि तसेंच पाहिलें तर कोणा रसिक विद्यार्थ्याला व्याकरण मनापासून आवडतें? चित्रहीन चौकट व

व्याकरणाचे नियम या दोन्हींतहि लक्ष वेधून घेण्यासारखें कांहींच नसतें. क्रिकेट कसें खेळावें या संबंधाचे नियम वाचतांना खेळाडूचेंहि अंतः-करण निर्विकार रहातें. पण प्रत्यक्ष खेळ पहातांना नियमांची फारशी माहिती नसणारा प्रेक्षकसुद्धां तद्रूप होऊन ' शाबास ! ' ' अरेरे ! ' वगैरे उद्गार काढूं लागतो.

गोपाळरावांची या वेळची एक आख्यायिका प्रसिद्ध आहे. त्यांना शाळेंत येण्याला उशीर झालेला पाहून त्यांचे शिक्षक म्हणाले, ' तुम्ही असेच मागें पडणार. तुमच्या हातून काय होणार ? ' काडवाला * कोणी डिवचलें तर तो नुसता वळवळतो; नागाला धक्का लागण्याचा अवकाश, त्यानें फडा वर केली म्हणून समजावेंच. आगरकरांनीं शिक्षकांना उत्तर दिलें कीं, ' आपल्यासारखा एम्. ए. होईन तरच नांवाचा आगरकर ! ' मेघांच्या घर्षणामुळें उत्पन्न होणाऱ्या विजेप्रमाणें हें उत्तर वाटतें. केशव-सुतांना त्यांच्या एका शिक्षकांनीं दुर्मुखलेला म्हटलें, गुरूच्या टोमण्याला त्यांनीं कवितेंत असेंच तेजस्वी उत्तर दिलें आहे.

माझ्या दुर्मुखल्या मुखामधुनि या चालावयाचा पुढें
आहे सुन्दर तो सदा सरसवाङ् निष्यंद चोहींकडे !
तुम्हीं नाहिं तरी सुतादि तुमचे घातील तो प्राशुनी !
कोणीही पुसणार नाहिं ' कवि तो होता कसा आननीं ?'

आगरकरांची वरील आख्यायिका पूर्णपणें विश्वसनीय आहे असें वाटत नाहीं. कारण तिच्यांतील गुरु दुसरे कोणी नसून महाजनि हेच आहेत व त्यांच्या आठवणींत तर या चकमकीची मुळींच नोंद नाहीं.

---

* गांडूळ या अर्थाचा कोंकणी शब्द.

कऱ्हाडला पोटाच्या खळगींत गोपाळरावांचे सर्व मनोरथ गडप होतात कीं काय अशी स्थिति होती. अकोल्याला आल्यानंतर पोटातली आग रक्ताच्या पाण्यानें शान्त करण्याचा प्रसंग सुदैवानें त्यांच्यावर आला नाहीं. बरोबर तीन वर्षांत त्यांनीं प्रवेशपरीक्षेपर्यंतचा अभ्यास संपविला व वयाच्या एकोणिसाव्या वर्षीं ( इ. स. १८७५ ) ते प्रवेशपरीक्षेंत उत्तीर्ण झाले.विद्यागिरीची पहिली उंच टेंकडी या मागील टेंकडीपेक्षां कितीतरी उंच व खडकाळ! पहिली टेंकडी चढणारांपैकीं निम्मेशिम्मे लोक ही दुसरी टेंकडी चढायच्या नादालाच लागत नाहींत.गोपाळरावांचे धाकटे मामा आदल्याच वर्षीं कॉलेजांत गेले होते. त्यांच्या खर्चाची जबाबदारी अकोल्याच्या मामावर असल्यामुळें भाच्याला मदत करणें त्यांना सर्वथैव अशक्य होतें. उच्च शिक्षणाचा सागर ओलांडून जाण्याची गोपाळरावांना उत्कट इच्छा होती. 'धनरूपी नौकेच्या आधाराशिवाय हें धाडस करणें मूर्खपणाचें आहे; या फंदांत पडाल तर फुकट बुडाल,' असा पोक्त सल्ला अनेक व्यवहारपटु लोकांनी त्यांना दिला. गरिबानें उच्च शिक्षण घेण्याचा हट्ट धरून उपयोग काय? लहान मुलानें आकाशांतला चांदोबा मागितला म्हणून तो त्याला मिळतो थोडाच, अशी या व्यवहारचतुरांची विचारसरणी होती. पण जन्मतःच सूर्यबिंब कवळायला उड्डाण करणाऱ्या हनुमानाप्रमाणें असलेला गोपाळरावांचा उत्साह त्यांना स्वस्थ थोडाच बसूं देणार! काय वाटेल तें करीन, पण पदवीधर होईनच होईन असा त्यांनीं निश्चय केला. सरस्वती प्रसन्न व्हावी म्हणून गोपाळरावांनीं केलेले परिश्रम, दाखविलेली चिकाटी व सोसलेले हाल डोळ्यांपुढें उभे राहिले म्हणजे, ईश्वरप्राप्तीसाठीं सर्वसंगपरित्याग करणाऱ्या साधुसंतांशीं त्यांची तुलना करण्याचा मोह अनावर होतो.

गोपाळरावांच्या गुरूंनीं आपआपसांत वर्गणी करून साठ रुपये जमविले व कॉलेजांतील पहिल्या तीन महिन्यांच्या खर्चाला पुरेल

एवढी रक्कम गोपाळरावांच्या हवालीं केली. ते साठ रुपये गोपाळरावांना त्या वेळीं सहारेच्या ठिकाणीं होते. सहारा वाळवंटांतून प्रवास करतांना मध्यें साध्या झाडाची सावली लाभली तरी, तिची किंमत एरवींच्या गर्द राईपेक्षांहि अधिक वाटते. ही गुरुदक्षिणा घेऊन गोपाळरावांनीं डेक्कन कॉलेजांत प्रवेश केला. अकोल्याला 'वऱ्हाड-समाचार' नांवाचें वर्तमानपत्र त्या वेळीं निघत होतें. त्या पत्राच्या संपादकांनीं गोपाळरावांकडे लेखनसाहाय्याची मागणी केली व त्याबद्दल दरमहा पांच रुपये देण्याचें अभिवचन दिलें. गरजवन्ताला मोल नसतें, हें ध्यानांत आणून गोपाळरावांनीं आपल्या लेखणीला 'समाचार' ची सेवा करायला लावली. फूल मिळणें दूरच राहिलें, उलट जिकडे तिकडे कांटेच दिसत होते; अशा वेळीं फुलाच्या पाकळीचा अव्हेर करून कसें चालणार? तीन महिन्यांनंतर गोपाळरावांना ज्यूनियर स्कॉलरशिप मिळाली. शिष्यवृत्ति म्हणजे द्रव्यसाहाय्याचा अखंड झरा खरा; पण त्या झऱ्याला भरपूर पाणी असलें तरच विद्यार्थ्यांची विद्यावेल टवटवीत रहावयाची मिळालेली शिष्यवृत्ति खर्चाला पुरत नसल्यामुळें गोपाळराव द्रव्यार्जनाचे निरनिराळे मार्ग शोधूं लागले. लहानपणापासून लेखणी व वाणी या दोन्ही देवता त्यांना पूर्णपणें प्रसन्न होत्या. त्यांनीं यावेळीं आपल्या लाडक्या भक्ताला थोडेंफार साहाय्य केलें. डेक्कन कॉलेजच्या संमेलनानें पन्नास रुपयांचें बक्षीस लावून निबंध मागविले होते. गोपाळरावांच्या लेखणीनें ते पन्नास रुपये मिळविले. या वेळीं त्यांनीं लिहिलेल्या निबंधाचें नांव 'हिंदु-एकत्र-कुटुंब-पद्धति' हें होतें. गांवांतल्या वक्तृत्व समारंभांत भाग घेऊन त्यांच्या वाणीनें आणखी पन्नास रुपये मिळविले.

ही शंभर रुपयांची कमाई गोपाळरावांना भूषणास्पद असली तरी, कॉलेजच्या वाढत्या खर्चाला पुरेशी नव्हती. नदींत डौलानें चालणारी नाव समुद्रांत टिकाव काढूं शकत नाहीं. खर्चाच्या मानानें जमा कमी, आवश्यक गोष्टींतदेखील हात आंखडता घेतल्यावांचून गत्यंतर नाहीं,

अशा परिस्थितींत गोपाळरावांनीं हे दिवस काढले. कपड्यांच्या बाबतीं-तले त्यांचे हाल पाहून दमयन्तीच्या अर्धवस्त्रावर दिवस काढणाऱ्या नळालादेखील आपली स्थिति बरी वाटली असती. कित्येक वेळां एका सदऱ्यावर त्यांना सर्व व्यवहार करावा लागे. रात्रीं जिकडे तिकडे साम-सूम झालें कीं, हा सदरा धुऊन वाळत टाकायचा; सकाळीं तो वाळला म्हणजे अंगांत घालायचा. आईबापांच्या जिवावर अल्पाकसर्जचे कोट घालणाऱ्या आणि दिवसाला एक असे तीस शर्ट करून ते परटाकडे धुवायला देणाऱ्या आजच्या ऐदी विद्यार्थ्यांना आगरकरांनीं या वेळीं सोसलेल्या कष्टांची व मनस्तापाची कल्पनाहि करतां येणार नाहीं.

एम्. ए. च्या परीक्षेच्या वेळीं फी भरण्याला गोपाळरावांच्याजवळ पैसे नव्हते; पण स्वारी बिलकूल डगमगली नाहीं. आपली लेखणी कामधेनु आहे अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. फीचे पैसे मिळविण्याकरतां एक नाटक लिहावयाला त्यांनीं सुरुवात केली.नाटकलेखनाकरतां जाग्रणें होऊं लागलीं. ही गोष्ट त्या वेळचे डेक्कन कॉलेजांतील गणिताचे अध्या-पक केरूनाना छत्रे यांना कळली व त्यांनीं गोपाळरावांची फी भरल्या-मुळें ते लिहीत असलेलें नाटक अपूर्ण स्थितींतहि आनंदपर्यवसायी झालें. बी. ए. होईपर्यंतच्या तीन वर्षांत गोपाळराव अहर्निश दारिद्र्याशीं झुंजत होते, असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं. या द्वंद्वयुद्धांत गोपाळ-रावांनीं विजय मिळविला खरा, पण त्यांचा शत्रू जातां जातां असा वार करून गेला कीं ती जखम पुन्हां कधींहि भरून आली नाहीं; किंबहुना तिनेंच गोपाळरावांचा मृत्यु अकालीं घडवून आणला, असें म्हटलें तरी हरकत नाहीं. सूर्याचा प्रकाश मंद झाला कीं घुबडें डोकीं वर काढतात; मनुष्याची जीवनशक्ति कमी झाली कीं रोगांचेंहि असेंच फावतें. अन्नवस्त्राची आबाळ, पैशाची काळजी, अभ्यासाची आंच आणि जागृत होऊं लागलेल्या मनाची देशाविषयीं अखंड तळमळ, यांपैकीं एक एक गोष्टदेखील मनुष्याच्या प्रकृतीवर वाईट परिणाम करूं शकते.

मग या चारींच्या समुच्चयानें गोपाळरावांची प्रकृति खालावली यांत नवल तें काय? व्यापारांत मोठी ठोकर बसली कीं, व्यापाऱ्याचे सावकार जसे त्याच्यामागें कर्जाचा तगादा लावतात, त्याप्रमाणें आगरकरांची शरीरसंपत्ति खालावलेली पहातांच त्यांच्या अनुवंशिक दम्यानें उचल खाल्ली!

त्या वेळच्या पद्धतीप्रमाणें बी. ए. होण्यापूर्वींच आगरकरांच्या दोन हातांचे चार हात झाले. पुढें त्यांनीं जीं विवाहविषयक मतें प्रतिपादन केलीं, तीं या वेळीं त्यांच्या मनांत कितपत विकसित झालीं होतीं हें नक्की सांगणें कठीण आहे. देशासाठीं कांहींतरी करावें, ही ज्योति प्रथमपासूनच अंतःकरणांत तेवत होती. पण तें 'कांहींतरी' ईश्वराप्रमाणें निराकार होतें; त्याचा आकार त्या वेळीं दिसलाच असेल तर तो अत्यंत अस्पष्ट होता.आपल्या देशांत जिकडे तिकडे माजलेला अंधार नाहींसा करावयाचा असेल तर प्रत्येक व्यक्तीच्या हातांत ज्ञानदीप दिला पाहिजे, ही कल्पना त्यांच्या मनांत लहानपणापासून दृढमूल झाली होती; सामाजिक सुधारणेविषयीं मात्र तसें म्हणतां येणार नाहीं. इसवी सन १८७८ त बी. ए. झाल्यानंतर फेलो होऊन एम्. ए. चा अभ्यास करण्याकरतां ते कॉलेजात राहिले. एम्.ए. ला तत्त्वज्ञान व इतिहास हे त्यांचे आवश्यक विषय होते. हा तत्त्वज्ञानाचा अभ्यास करीत असतांना मिल्ल व स्पेन्सर यांच्या ग्रंथांचें त्यांनीं अध्ययन केलें.या दोन्ही लेखकांच्या विचारसरणीचा व तत्त्वज्ञानाचा त्यांच्यावर अतिशय परिणाम झाला. भावनाप्रधान स्वभाव लाखेप्रमाणें असतो. या लाखेला अनुभवाची आंच लागली कीं तिच्यावर भोंवतालच्या दृश्यांचे ठसे भराभर उमटूं लागतात. आगरकरांत मूळचीच सहृदयता अधिक; लहानपणापासून स्वावलंबन अंगीं बाणल्यामुळें स्वतंत्र विचार करण्याची शक्ति स्वाभाविकच वाढलेली; अशा रीतीनें प्रज्वलित झालेल्या त्यांच्या विचाराग्नीला मिल्ल व स्पेन्सर यांच्या सडेतोड विचारसरणीच्या वाऱ्याचें पाठबळ

मिळालें. मग सामाजिक चालीरीतींतील हिण कोणतें व बावनकशी सोनें कोणतें हें पारखण्याची शक्ति त्यांना प्राप्त झाली यांत नवल तें काय ?

बुद्धिप्रामाण्य हा मिल्ल व स्पेन्सर यांचा परवल. शास्त्रें अमुक म्हणतात, लोक तमुक सांगतात, म्हणून कुठलीहि गोष्ट मनुष्यानें करतां कामा नये. स्वतःच्या बुद्धीला जें पटेल, स्वतःच्या विचारांच्या कसोटीला जें उतरेल, तें प्रचलित रूढीविरुद्ध अगर जुन्या पोथ्यांविरुद्ध असलें तरी, प्रत्येकानें आचरणांत आणलें पाहिजे, हा बुद्धिप्रामाण्याचा आत्मा. 'कोणतेहि आचार घालण्यास पूर्वींच्या ऋषींस जितका अधिकार होता तितकाच आम्हांसहि आहे; पूर्वकालीन आचार्यांवर ईश्वराची जितकी कृपा होती तितकीच आम्हांवरहि आहे; व त्याच्याशीं त्यांचा जितका संबंध होता तितकाच आमचाहि आहे; बऱ्यावाइटाची निवडानिवड करण्याची जितकी बुद्धि त्यांना होती तितकी किंवा तीहून अधिक आम्हांसहि आहे; अनुजांसाठीं त्यांचें अंतःकरण जितकें कळवळत होतें तितकें किंवा त्याहून अधिक आमचेंहि कळवळत आहे; सृष्टिविषयक व तत्कर्तृविषयक ज्ञान जितकें त्यांस होतें तितकें, किंबहुना त्याहून बरेंच अधिक ज्ञान आम्हांस आहे; सबब त्यांनीं घालून दिलेल्या नियमांपैकीं जेवढे हितकारक असतील तेवढ्यांचेंच आम्ही पालन करणार व जे अपायकारक असतील ते टाकून देऊन त्यांचे जागीं आम्हांस निर्दोष वाटतील असे नवीन घालणार;' अशी घोषणा आगरकरांनीं आपल्या 'स्वयंवर' या निबंधांत केली आहे. बुद्धि, तर्क व विचार यांच्या अग्निदिव्यांतून जें पार पडेल तेंच खरें सत्य, हा या विचारसरणीचा मतितार्थ आहे.

मिल्ल व स्पेन्सर यांच्या या भक्ताचा व महर्षि रानडे यांचा एकदां खटका उडाला होता असें म्हणतात. डेक्कन कॉलेजच्या संमेलनाला न्यायमूर्ति रानडे गेले होते. बोलतां बोलतां स्पेन्सरविषयीं बोलणें

निघालें. आगरकरांनीं स्पेन्सरची बाजू घेतलेली पाहून न्यायमूर्ति रागावले व उद्गारले, 'तुम्ही अलीकडची मंडळी स्पेन्सर व मिल्ल वाचतां आणि तुमची नीतिमत्ता बिघडते.' रानड्यांना मिल्ल-स्पेन्सराविषयीं मुळींच प्रेम वाटत नव्हतें. तोंडानें या तत्त्वज्ञांच्या मतांचें मंडन करीत असतांना हातानें मदिरेचे चषक उचलणारे तरुण त्या वेळीं कांहीं थोडेथोडके नव्हते. दुधानें तोंड पोळल्यामुळें ताकहि ऊन मानावें, तशी रानड्यांनीं आगरकरांची संभावना केली. या वादाच्या वेळीं हजर असलेल्या महाजनींनीं आगरकरांच्या शुद्ध शीलाचा निर्वाळा दिल्यामुळें रानड्यांचा त्यांच्याविषयीं गैरसमज झाला नाहीं. बाकी मिल्ल व स्पेन्सर न वाचतांहि नीतिमत्ता बिघडूं शकते, हें रानड्यांनीं लक्षांत घेतलें असतें तर त्यांनीं असे उद्गार काढले नसते. दुष्ट बुद्धीचे लोक इतरांच्या घराला आग लावण्याच्या कामीं अग्नीचा उपयोग करतात म्हणून त्याला दोष देण्यांत अर्थ काय ?

एम्.ए. चा अभ्यास करीत असतांना आगरकरांच्या डोळ्यांपुढें कितीतरी कल्पनाचित्रें उभीं रहात असतील. एम्. ए. झालेल्या मनुष्याला लठ्ठ पगाराची सरकारी नोकरी त्या वेळीं दुर्लभ नव्हती. दुसरी कोणी सामान्य व्यक्ति असती तर, उपासांचें पारणें फेडण्याकरितां उत्सुक झालेल्या मनुष्याप्रमाणें, पायांत रुपेरी शृंखला अडकवून गाद्यागिरद्यांवर लोळत पडण्यांत, तिनें धन्यता मानली असती. कॉलेजांत आल्यापासून गोपाळरावांच्या आनुवंशिक दम्यानें डोकें वर काढलें होतें. त्याचा प्रतिकार करण्यासाठीं त्यांनीं भरपूर पगाराची सुखवस्तु सरकारी नोकरी पतकरली असती तर त्यांत नांवें ठेवण्यासारखें कांहींच नव्हतें. पण समाजसेवा हेंच ज्यांच्या आयुष्याचें ध्येय, देशबांधव हेंच ज्यांचें देव, त्यांना पैसा अगर प्रतिष्ठा यांची कितीशी किंमत वाटणार ? बी. ए. होतांच त्यांनीं आपल्या आईला पुढील आशयाचें पत्र लिहिलें होतें—'आपल्या मुलाच्या मोठाल्या

परीक्षा होत आहेत, आतां त्याला मोठाल्या पगाराची चाकरी लागेल व आपले पांग फिटतील, असे मोठाले मनोरथ, आई, तूं करीत असशील; पण मी आतांच तुला सांगून टाकतों कीं, विशेष संपत्तीची, विशेष सुखाची हांव न धरतां मी• फक्त पोटापुरत्या पैशावर संतोष मानून सर्व वेळ परहितार्थ खर्च करणार.'

दमा व दारिद्र्य हे दोन रोग हात धुऊन पाठीमागें लागले असतांना, आपण नुसती मान पुढें करण्याचा अवकाश कीं लक्ष्मीची माळ आपल्या गळ्यांत पडणार ही गोष्ट माहीत असतांना, वयाच्या बाविसाव्या वर्षी राज-लक्ष्मीकडे पाठ फिरवून लोकगंगेकडे धांव घेणाऱ्या गोपाळरावांनीं आईला लिहिलेलें वरील पत्र ज्याचें अंतःकरण उचंबळून टाकणार नाहीं, असा एक तरी मनुष्य महाराष्ट्रांत असेल काय ?

# प्रकरण तिसरें

## केवळ सत्यासाठीं

इ. स. १८७९ च्या सप्टेंबर महिन्यांतली रात्र. नारायणपेठेंतील विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या घरीं डेक्कन कॉलेजचे दोन तेवीस वर्षांचे तरुण विद्यार्थी आले. विष्णुशास्त्र्यांचें व त्यांचें किती तरी वेळ बोलणें चाललें होतें. त्या वेळीं सारें पुणें, किंबहुना महाराष्ट्र झोंपला होता. पण गीतेंत वर्णन केलेल्या संयम्यांचें हें त्रिकूट स्वतः जागृत राहून आपल्या देशबांधवांना कसें जागृत करतां येईल याचा विचार करीत होतें. विष्णुशास्त्री आपल्या पायांतील रुपेरी शृंखलेला कंटाळले होते; या दोघां तरुणांनीं तिचा स्पर्शहि आपल्या पायांना होऊं द्यायचा नाहीं, असा निश्चय केला होता. मानमरातब, पैसा, पदवी, या सर्वांपेक्षां ध्येयाच्या ध्रुव-ताऱ्याकडे या तिघांचीहि दृष्टि होती. समुद्राला नद्यांचें पाणी मिळतें, तें त्यानें फुगून गर्जना करीत बसावें; अगर नौकांना जलसमाधि देऊन आपली ' कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् अशी शक्ति दाखवावी एवढ्यासाठीं नव्हे; तर सूर्यकिरणांच्या द्वारें त्यानें तें पाणी आकाशांत पोंचवावें व पृथ्वीला पर्जन्य मिळेल अशी व्यवस्था करावी म्हणून. सुशिक्षितांची विद्याहि अशीच बहुजनसमाजाच्या उपयोगाकरतां असते. चिपळूणकर, आगरकर व टिळक या तिघांनाहि समाज दगडाप्रमाणें स्वस्थ पडला आहे हें दिसत होतें. या दगडाच्या आंत असलेली देवाची मूर्ति टाकीचे घाव घातल्यावांचून बाहेर पडणार नाहीं अशी त्यांची खात्री होती. निबंधमालेच्या रूपानें शास्त्रीबोवा हें कार्य करीत होतेच; पण निबंधमाला प्रौढांना शिक्षण देत असली तरी, बालकांच्या शिक्षणाचें कार्य तिच्या हातून पार पडणें शक्य

नव्हतें; या कामाला शाळाच पाहिजे होती. महाराष्ट्रांतील या तीन तेजस्वी व्यक्तींचा संगम होऊन शाळेच्या कल्पनेला मूर्तरूप आलें. शास्त्रीबोवांचा निरोप घेऊन परत कॉलेजकडे जातांना भोंवतालीं अंधार दाटला असला तरी, टिळक-आगरकरांचीं अंतःकरणें ध्येयाच्या दीप्तीनें उजळलीं होतीं. शरीर थंडीनें कुडकुडत असतांनाहि त्यांचीं मनें आनंदानें फुलून गेलीं होतीं.

'ता. १ जानेवारी १८८० हा दिवस आमचें निशाण उभारण्याला आम्ही निश्चित केला आहे,' असें विष्णुशास्त्र्यांनीं आपल्या बंधूंना लिहिलें. किरकोळ अडचणींमुळें शाळेची प्रतिष्ठा एक तारखेला न होतां दोन तारखेदिवशीं झाली. शाळेच्या पहिल्या वर्षीं आगरकर मनानें आपल्या 'न्यू इंग्लिश स्कूल' मध्यें असलें तरी शरीरानें डेक्कन कॉलेजमध्येंच होते. ते एम्. ए. च्या परीक्षेंत उत्तीर्ण झाले नाहींत. एकदां कार्याच्या प्रवाहांत सांपडलें कीं परीक्षा पुन्हां हाताला लागणार नाहीं, तेव्हां त्यांनीं एम्. ए. झाल्यावरच शाळेंत काम करावयाला सुरुवात करावी, असें त्यांच्या सहकाऱ्यांचें मत पडलें. अशा रीतीनें प्रत्यक्ष कार्य करण्याच्या समाधानाला ते मुकले तरी त्यांचें मन सदैव या शाळेचाच विचार करीत असे. श्री. सी. ग. देवधर त्या वेळीं डेक्कन कॉलेजांत नुक्ते आले होते. कॉलेजचा अभ्यासक्रम संपल्यानंतर त्यांनीं आपल्या संस्थेला मिळावें म्हणून आगरकरांनीं याच वेळीं त्यांच्यापाशीं शब्द टाकून त्यांच्याकडून संमतिदर्शक वचनहि घेतलें.

पैशाच्या पायघड्या घातलेला सरकारी नोकरीचा मार्ग सोडून स्वाभीमानानें नवा मार्ग काढणाऱ्या या मंडळींना अभूतपूर्व यश मिळालें. शाळा सुरू झाली त्या दिवशीं हजिरीपटावर दीडशेंचा आंकडा होता. वर्षअखेर ही संख्या ३३६ झाली. सरकारी हायस्कूल या खाजगी शाळेपुढें निस्तेज दिसूं लागलें. वामन शिवराम आपट्यांसारख्या विद्वान्

शिक्षकाची जोड शाळेला लवकरच लाभली व भरतीच्या लाटांप्रमाणें शाळेंतील विद्यार्थ्यांची संख्या दरवर्षी पूर्वीच्यापेक्षां वाढूं लागली.

पण समाजाची जागृति व्हावयाला बालशिक्षणाइतकेंच प्रौढ-शिक्षणहि आवश्यक आहे. हें प्रौढशिक्षणाचें कामहि याच मंडळींनीं अंगावर घेतलें आणि २ जानेवारी १८८१ रोजीं 'मराठा' व ४ जानेवारी १८८१ या दिवशीं 'केसरी' जन्माला आला. केवळ पोटा-पाण्याचा उद्योग म्हणून या तरुण मंडळींनीं हीं वर्तमानपत्रें काढलीं, असें त्याच्या शत्रूलाहि म्हणतां आलें नसतें. श्री. सी. ग. देवधर यांना २ ऑक्टोबर १८८९ रोजीं लिहिलेल्या पत्रांत, 'मी गेलीं पांच वर्षें वर्तमानपत्रांत लिहीत आहे; पण या लेखनाबद्दल मला एक पैहि मिळाली नाहीं', अशी आगरकरांनीं स्पष्ट कबुली दिली आहे. ज्या निःस्वार्थ बुद्धीनें या तरुणांनीं शाळा उभारली त्याच निरपेक्ष वृत्तीनें त्यांनीं वृत्तपत्रें चालविलीं. केसरीच्या दुसऱ्याच वर्षीं त्याच्या गर्जनेनें मर्यादातिक्रमण केल्याबद्दल आगरकरांना १०१ दिवसांची शिक्षा झाली. मराठ्यावर संपादक म्हणून टिळकांचें नांव असल्यामुळें त्यांनाहि आगरकरांबरोबर डोंगरीचा तुरुंग पहावा लागला. त्या ठिकाणीं मागच्या आठवणी व पुढच्या आशा यांचें चिंतन करण्यांत त्या दोघांच्या रात्रीच्यारात्री निघून जात. आपल्या या तुरुंगवासाचें वर्णन करतांना आगरकर म्हणतात, "सरकारी नोकरी न पतकरतां देश-सेवेंत आयुष्य घालविण्याचा ज्या दिवशीं निश्चय केला, त्या दिवसा-पासून आम्ही जें जें बोललों, चाललों होतों त्याची पुनः पुनः आठवण होऊन अनेक वेळां पुनरावृत्ति होत असे........ आपले मूळचे हेतु कोणते व ते कितपत सिद्धीस गेले आहेत; शास्त्रीबोवांच्या अकालीं मृत्यूनें आपल्या उद्योगास केवढा धक्का बसला; **आम्हीं आरंभिलेलीं कामें आमच्या हयातींत व आमच्या पाठीमागें**

**कित्येक वर्षें अप्रतिहत चालली तर आमच्या देशस्थितीवर त्यांचा काय परिणाम होईल;** या देशावर इंग्रजांचें राज्य झाल्यानें त्यांचें कोणकोणत्या बाबतींत हित आणि अनहित होत आहे; लोक-शिक्षण उत्तरोत्तर जारीनें पसरत गेलें तर हिंदुस्थानची भावी स्थिति काय होईल; नेटिव्ह संस्थानांची सुधारणा होण्यास काय उपाय करावे; देशभाषा युनिव्हर्सिटींत आणण्याला कोणती युक्ति काढावी; शाळा आणि कॉलेज बांधण्यास पैसे कसे गोळा करावे; कोल्हापूर प्रकरणांत आपली चुकी किती आणि आपणांस भोगावी लागत असलेली शिक्षा कितपत न्याय्य आहे; आपण या तऱ्हेनें येथें अडकून राहिल्यानें लोकांच्या मनावर काय परिणाम होईल व आपल्या शाळेचें व छापखा-खान्याचें किती नुकसान होईल; आणीबाणीच्या प्रसंगीं आपणांस कोणकोण मित्र उपयोगी पडले व पुढें कोणकोणाच्या मदतीवर आणि शब्दांवर अवलंबून रहातां येईल; आतांप्रमाणें फिरून तुरुंगांत न येण्या-साठीं कोणत्या गोष्टींची खबरदारी ठेविली पाहिजे; **फिरून तुरुंगांत यावें लागलें तरी ज्या गोष्टी केल्याच पाहिजेत अशा** गोष्टी कोणत्या, वगैरे नाहीं नाहीं त्या विषयांवर आमचा एक एक वेळ येवढ्या जोरानें वाद चाले कीं, आसपासचे शिपाई 'हळू बोला, हळू बोला' असा इशारा करीत व बोलतां बोलतां रात्र निघून जाई." अठरा विश्वें दारिद्र्यांत बाल्य व विद्यार्थिदशा गेलेली, राज-सेवेचा राजमार्ग सोडून स्वावलंबनाची आडवाट आपण होऊन पतकर-लेली, पूर्वजन्मींच्या दावेदाराप्रमाणें दमा फुप्फुसांत दबा धरून बसलेला, शिक्षक म्हणून शाळेकडून मिळणाऱ्या तीस रुपये पगारावर तीस दिवसांचा चरितार्थ चालविणें प्राप्त झालेलें ! पण तुरुंगांत येऊनहि गोष्टी कसल्या—तर शिक्षण, भाषा व समाज यांच्या सुधारणांच्या ! त्यांचें शरीर कारागृहांत कोंडून ठेवलें तरी मन भविष्यकाळांत

भराऱ्या मारीत होतें. मनानें समाजाच्या हिताचें चिंतन, तोंडानें समाजाच्या कल्याणाचें विवेचन, कानानें सहकाऱ्यांच्या उत्साहवर्धक भाषणाचें श्रवण ! सदासर्वदा समाजहिताच्या चिंतनांत टाळी लागलेली !

आगरकर व टिळक यांना कोल्हापूर–प्रकरणानें डोंगरीचा तुरुंग दाखविला. कोल्हापूरचे शिवाजीमहाराज आपले कारभारी रावबहादूर माधवराव बर्वे यांच्या छळामुळें वेडे झाले आहेत, असा लोकांचा समज झाला होता. खऱ्या क्षत्रियाच्या तरवारीप्रमाणें जातिवंत संपादकाची लेखणी ही दुष्टांना दंड करण्याला नेहमींच उद्यक्त असते. प्रेमाप्रमाणें उत्साहहि आंधळा असल्यामुळें, बर्वे यांच्यावर लोक जो आरोप करीत होते त्याचें न्यायकचेरींत पूर्ण समर्थन आपल्याला करतां येईल कीं नाहीं, ह्या गोष्टीकडे केसरी-मराठ्याच्या तरुण लेखकांचें जावें तितकें लक्ष गेलें नाहीं. नागाचें डोकें ठेचण्यासारखा सोटा जवळ असेल तरच त्याच्या वाटेस जावें, नुसत्या साध्या काठीनें त्याला डिवचणें बरें नाहीं, हा नियम अन्यायाच्या बाबतींतहि लागू पडतो. बर्वे यांनीं केसरी व मराठा या दोन्ही पत्रांवर फिर्याद केली. फिर्यादीची तरवार मानेवर लटकत असतांनाच मृत्यूची वीज कडकडत आली व विष्णु-शास्त्र्यांवर कोसळली. भुंग्याप्रमाणें संकटेंहि रांगेनेंच येतात असें त्या-वेळीं या मंडळींना वाटलें असेल. व्यवहार सद्धेतूपेक्षां समर्थनालाच महत्त्व देतो. आगरकर-टिळकांनीं आपल्या लेखनाचें केलेलें समर्थन न्यायदेवतेला पटलें नाहीं व एक चातुर्मास त्यांनीं सरकारचा पाहुण-चार घ्यावा असें तिनें फर्माविलें. तुरुंगांतून सुटून आल्यावर ‘ जबाब-दारीचे लेख लिहितांना आपल्या सरकारच्या भलेपणावर, आपल्या समाजांतील बड्या बड्या धेंडांच्या उमद्या थापांवर व आपल्या येथील भेकड संस्थानिकांच्या शब्दावर किंवा धैर्यावर कधींहि फारशी भिस्त ठेवूं नये ’ अशी धोक्याची सूचना आगरकरांनीं स्वानुभवानें आपल्या

व्यवसायबंधूंना दिली. उसन्या पिसांप्रमाणें पाठिंबा देणाऱ्या [illegible] लोकांचें हातपायहि ऐनवेळीं गळून जातात.

इतरांनीं पुराव्याच्या बाबतींत मागें पाय काढला म्हणून आपण तोंडघशीं पडलों, ही जाणीव आगरकरांना असली तरी तुरुंगांत त्यांची वृत्ति नेहमीं आनंदी असे. डोंगरीवरील सरकारी सासुरवाडींत घेतलेल्या १०१ दिवसांच्या पाहुणचाराचे विनोदी वर्णन त्यांनीं 'डोंगरीच्या तुरुंगांतील आमचे एकशें एक दिवस' या छोट्या पुस्तकांत केलें आहे. एक पाय तुटल्याचें दुःख, एका बुटाचा खर्च कमी झाला म्हणून, गोड मानून घेणाऱ्या मनुष्याची गोष्ट सर्वश्रुत आहे. ही विनोदी वृत्ति आगरकरांच्या अंगींहि पुरेपूर बाणली होती. तुरुंगांतील स्मश्रूसमारंभाचें वर्णन त्यांनीं मोठ्या बहारीनें केलें आहे. ' पाठीमागें कामाचा त्रास नसल्यामुळें आम्हांला पाहिजे तर बाहेरच्याप्रमाणें आठव्या दिवशीं आरास करून घेतां येती; पण तेथला तो चतुर कैदी कारागीर, तें थंड खारें पाणी, ते दिव्य लोणकापी कंट्री वस्तेर वगैरे थाट पाहून स्मश्रू वाढूं देणेंच आम्हांस बरें वाटे; शिवाय अंगांतील रक्त एकदां नाहींसें झाल्यावर त्या बिचारीची वाढच खुंटली ! '

कवीला ज्याप्रमाणे कोणताहि विषय स्फूर्ति देऊं शकतो त्याप्रमाणें कोणताहि अनुभव विचारवंताला मनन करावयाला लावतो. यादृष्टीनें ' नाना तऱ्हेचे कैदी ' हें सदरहू पुस्तकांतील सदर वाचनीय व मनोरंजक आहे. डेकोस्टासाहेब नांवाचे एक वेडेपीर आगरकरांना तुरुंगवासाच्या अवधींत भेटले होते.सुमारें दीडतास डोकें ताळ्यावर ठेवून ते बोलले. पुढें मात्र ' मी कोण आहे हें तुम्हांला ठाऊक आहे का ? मी प्रिन्स ऑफ वेल्स आहें. जॉन डेकोस्टा हें खोटें नांव घेऊन तुरुंगाच्या आंतील स्थितीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठीं मी येथें आलों आहें; अशा प्रकारचीं निरनिराळीं नांवें घेऊन लोकांची विपत्ति पहाण्याकरतां मी अनेक ठिकाणीं फिरतों. तुमचा तोंडवळा मला चीनच्या बादशहाच्या

तोंडवळ्यासाखा दिसतो. तुम्ही कदाचित् अमेरिकेचे प्रेसिडेंटहि असाल.' वगैरे मुक्ताफळें त्यानें आगरकरांवर उधळून दिलीं. शाळेंतील आपल्या खुर्चीचें चीनच्या सिंहासनांत रूपान्तर झालेलें पाहून आगरकरांना या वेळीं निःसंशय हंसूं कोसळलें असेल.

या तुरुंगवासांतच पूर्वीं लिहावयाला घेतलेलें एक पुस्तक आगरकरांनीं पुरें केलें. हें पुस्तक म्हणजे शेक्सपिअरच्या हॅम्लेट नाटकाचें भाषान्तर 'विकार-विलसित' हें होय. हें भाषान्तर हातीं घेण्याचा मुख्य हेतु 'आर्योद्धारक मंडळीकडून त्याचे चारदोन प्रयोग करवून त्याचें जें उत्पन्न होईल तें केसरी-फंडाकडे लावावें' असा होता. नटवर्य गणपतराव जोशी यांनीं आपल्या अभिनयनैपुण्यानें आबालवृद्धांना परिचित केलेलें 'हॅम्लेट' नाटक दुसरें कोणतेंहि नसून आगरकरांनीं केलेलें भाषान्तरच आहे. आकाश आहे तिथें अभ्रें असायचींच, या न्यायानें आगरकरांचें भाषान्तर सदोष आहे हें सिद्ध करतां येईल हें खरें; पण त्या वेळीं खऱ्या हॅम्लेटचें प्रतिबिंब आगरकरांच्या भाषान्तररूपी आरशांत फार विकृत दिसूं लागलें, अशा समजुतीनें इतरांनीं जे आरसे पुढें केलें ते रंगभूमीनें फारसे हातीं धरले नाहींत. प्रो. वा. बा. केळकर यांच्या 'त्राटिके' त जें लालित्य व जी सहजसुंदरता आढळते ती 'विकारविलसितां' त दिसत नाहीं. तथापि, अर्थहानि न होऊं देतां, शेक्सपिअरच्या सर्व कल्पना मराठींत उतरविण्याचा आगरकरांनीं शक्य तितका प्रयत्न केला आहे, हें त्यांचें भाषान्तर न आवडणाऱ्या लोकांनाहि कबूल करावें लागेल. या भाषान्तराला त्यांनीं २८ पृष्ठांची मार्मिक व निःपक्षपाती प्रस्तावना जोडली आहे. 'आमच्याकडील कवि दश–रसांच्या पाशांत अगदीं जखडून गेल्यामुळें स्वभाववैचित्र्यवर्णन हा गुण त्यांच्यांत अत्यंत दुर्मिळ झाला आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.' हे त्यांचे या प्रस्तावनेंतील उद्गार किती सत्य

आहेत हें सांगायलाच नको. ही प्रस्तावना अधिक विस्तृत लिहिण्याची त्यांची इच्छा होती; पण 'दमा अधिक होऊन तो शरीराला व मनाला पीडा करूं लागल्यामुळें' त्यांना हात आंखडता घ्यावा लागला. आगरकरांसारख्या स्वार्थत्यागी विद्वानाचा विरह दम्यालाहि असह्य होत असावा !

१८८२ साल डोंगरीची हवापालट करण्यांत गेलें. या सालीं न्यू इंग्लिश स्कूलमधील विद्यार्थ्यांची संख्या ५९३ होती. पुढील सालीं ती ७३२ झाली. शाळेची वाढ शुक्लपक्षांतील चंद्राप्रमाणें होत होती, असें म्हटल्यानें त्या वाढीची यथार्थ कल्पना येणार नाहीं. शुक्लेंदु दर-रोज एका कलेनेंच वाढतो; पण १८८३ सालीं विद्यार्थ्यांची संख्या १३५ नीं वाढली, तर १८८४ या वर्षी जवळजवळ ३०० नवे विद्यार्थी येऊन, त्या संख्येनें हजाराची सीमा ओलांडली. टिळक, आगर-कर, आपटे, गोळे, केळकर प्रभृति विद्वान् शिक्षकांचें समाधान दुय्यम शिक्षण देणारी शाळा चालवून कसें होणार ? ग्रहांच्या विहाराला आकाशच पाहिजे; जमिनीवरील राजवाडा कितीहि मोठा झाला तरी त्यांच्या विलासाला तो अपुराच पडणार ! एकाच ध्येयानें प्रेरित होऊन शिक्षणप्रसार करावयाला निघालेल्या या तरुणांनीं 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' या नांवानें आपली संघटित संस्था काढली. त्यांनीं परि-श्रमानें वाढविलेल्या शिक्षणप्रसाराच्या वृक्षाला १८८४ च्या अखेर महा-विद्यालयाचें फळ आलें. कॉलेजचा पहिला वर्ग काढण्याची परवानगी मिळाली तेव्हां आगरकरांना किती आनंद झाला याची कल्पना त्यांच्या खालील संपादकीय उद्गारांवरून येईल. 'हें फर्ग्युसन कॉले-जचें गौडबंगाल काय आहे तें लवकरच वाचकांपुढें आणण्याचा आमचा विचार आहे. पण त्या प्रसंगीं त्यांनीं व इतरांनीं खबरदार असावें; कारण ती हकीकत वाचल्याबरोबर खिशांतील रुपये पटापट

उड्या टाकून दक्षिण–हिंदुस्थान–विद्याप्रसारक–मंडळीकडे येऊं लागले तर आम्ही जबाबदार नाहीं !'

इतिहास व अर्थशास्त्र हे आगरकरांचे आवडते विषय होते. त्यांच्या शिक्षणशैलीविषयीं टिळकचरित्रांत श्री. केळकर लिहितात, 'आगरकरांच्या वर्गांत मात्र विद्यार्थ्यांना घरीं बसल्यासारखें वाटे. त्यांचा चेहरा प्रशान्त असून त्यांच्या तोंडावर हंसरेपणाची झांक असे; आणि मुद्दाम गांभीर्य आणण्याकरतां ते डोळे मिटीत किंवा वर चढवीत, तेव्हांहि पण विद्यार्थी मनांत समजे कीं, हा गंभीरपणाचा निव्वळ बहाणा आहे. आगरकरांचें शिकाविणें विद्यार्थ्यांना पटण्यासारखें पण पाल्हाळिक असे.'

१८८५ च्या आरंभीं कॉलेज निघालें. पण कॉलेजमधलीं व्याख्यानें दिलीं कीं आपण आपल्या कर्तव्यांतून मोकळे झालों असें मानणारांपैकीं आगरकर मुळींच नव्हते. त्यांच्या भावनाशील मनाला कॉलेजमध्यें असतांनाच मिल्ल–स्पेन्सर यांच्या बुद्धिप्रामाण्य मानणाऱ्या तत्त्वज्ञानाची जोड मिळाली होती. समाजाच्या प्रगतीचें शिक्षण हें प्रमुख साधन आहे, अशी त्यांची श्रद्धा असल्यामुळें त्यांनीं स्वतःला शिक्षणकार्याला वाहूनहि घेतलें होतें, पण झाडाच्या मुळाला पाणी घालण्यइतकेंच त्याच्यावर पडलेली कीड झाडून टाकणेंहि त्याच्या पूर्ण वाढीच्या दृष्टीनें आवश्यक आहे असें त्यांचें मत होतें. भावनाप्रधान हृदय म्हणजे दुर्बीण व सूक्ष्मदर्शक यंत्र यांचा उत्कृष्ट संगम असतो. हजारों कोसांवर असलेल्या अज्ञ समाजबांधवांची लहानसहान दुःखेंहि त्याला स्पष्ट दिसतात. आगरकरांनीं समाजाच्या ज्या ज्या भागावर दृष्टि फेंकली तो तो भाग रूढीच्या रोगानें ग्रासलेला आहे, असेंच त्यांना दिसून आलें. ज्याचा ओंठ पिळला तर दूध निघेल, अशा पोराच्या दोन हाताचे चार हात करून पत्नीचें अधरामृत त्याला बळजबरीनें पाजलें जात होतें. लग्न म्हणजे काय याची जिला कल्पनाहि

नाहीं अशा आठदहा वर्षांच्या मुलीच्या गळ्यांत मंगळसूत्र बांधून तिची सासरीं रवानगी करून दिली जात होती. दुर्दैवानें अशा मुलीवर वैधव्याचा येऊं नये तो प्रसंग आला तर, तिला मुंडवळ्या बांधण्याचा उताविळपणा करणारे हात तिचें वपन करण्याच्या बाबतींतहि तितकीच घाई करीत असत. जणुं काय बारा वर्षांच्या बालविधवेच्या केंसांवर हिंदु-धर्माचें सर्व भवितव्य अवलंबून होतें. नाळ न कापलेल्या पोरापासून तों तिरडीवर बांधलेल्या म्हाताऱ्यापर्यंत सर्व जातींचीं सर्व माणसें रूढीच्या राक्षसी आज्ञा हूं कीं चूं न करतां ऐकत होतीं. धर्माच्या नांवाखालीं चाललेला हा छळ पाहून आगरकरांचें अंतःकरण प्रथमपासून तिळतिळ तुटत असे. डोंगरीच्या तुरुंगांतील वर्णन देतांना त्यांच्या लेखणींतून बाहेर पडलेले खालील उद्गार या बाबतींत त्यांच्या अंतःकरणाला किती पीळ पडत असे याची कल्पना करून देतील. 'तुरुंगांत बायको आली म्हणजे तिचे केंस कापतात व कांकणें पिचवितात; तरी तुरुंगाचे कडक कायदे अपराधी बायकांचीं डोकीं केवळ संन्याशाचे असोले गोटेच होऊं देत नाहींत; **निरपराधी बायकांस तसली विद्रूपता आणणें हें आमच्या सदय महर्षींच्या धर्माकडे सोंपविलें आहे.**

अंतरंगांत लाव्हा कढत असला म्हणजे ज्वालामुखीचा स्फोट कधीं ना कधीं तरी होणारच. तंबाखू ,पाऊस, ज्वालामुखी वगैरे सामान्य विषयांपासून तों स्त्रीदास्यविमोचन, स्वातंत्र्य, वगैरे महत्त्वाच्या विषयां-पर्यंत सर्वांवर आगरकरांची लेखणी चालत असे. तथापि समुद्राला नित्य भरती येत असली तरी खरें उधाण जसें पौर्णिमेचें, त्याप्रमाणें, लोकांत ज्ञानप्रसार व्हावा म्हणून नानाविध विषयांचें विवेचन केलें तरी, त्यांचें खरें अंतःकरण सामाजिक विषयांतच असे. १८८४ सालीं सरकारी कायद्याची मदत घेऊन बालविवाहाला प्रतिबंध करावा असा पूर्वपक्ष मलबारी शेटजींनीं केला. आगरकरांना हें मत पूर्णपणें मान्य असूनहि,

सर्व सहकारी त्यांच्या विरुद्ध असल्यामुळें, त्याचा केसरींतून पुरस्कार करण्याची मात्र त्यांना चोरी झाली. शारदा-विलासारखा हत्ती सद्यः स्थितींत लोकसंमताच्या सुईच्या नेढ्यांतून जाऊं शकतो; पण त्या वेळीं मुंगी जाण्याचीदेखील मारामार होती. केसरीवर संपादक म्हणून नाही आगरकरांचें, परंतु केसरीच्या चालकांपैकीं त्यांच्याखेरीज सर्व सामाजिक सुधारणेच्या बाबतींत आस्ते कदम हा सल्ला देणारे अगर स्वातंत्र्य व कामधेनु आहे, ती परत मिळवा म्हणजे सर्व इष्ट गोष्ट ती तुम्हांला देईल अशी गर्जना करणारे! आगरकरांची पदोपदीं कुचंबणा होऊं लागली. हळूहळू सामाजिक सुधारणेचा पुरस्कार करणारे लेख केसरींत फारसे येईनासे झाले; एकदोन रकान्यांत आगरकरांनीं स्वतःच्या नांवावर सामाजिक सुधारणेची चिकित्सा करीत बसावें अशी स्थिति आली. आगरकरांच्या अंतरींची तळमळ असल्या तुटपुंज्या लेखनानें कशी शांत होणार? भरून आलेल्या आभाळाला, पावळ्या गळूं लागेपर्यंतच तूं पर्जन्य पाड, असें सांगितलें, तर तें त्याला कसें रुचणार? आगरकरांनीं २५ ऑक्टोबर १८८७ रोजीं केसरीशीं असलेला आपला संबंध सोडला. एकाच पर्वताच्या उदरांतून निघणाऱ्या नद्यांचे मार्ग भिन्न होतात व त्यांची भिन्नता समाजाच्या सुखांत भरच घालते. टिळक व आगरकर यांच्यांत जी फाटाफूट झाली ती अशाच प्रकारची होती. याविषयीं खुद्द आगरकरच म्हणतात, 'ज्यांनीं राजसेवेचा सामान्य मार्ग सोडून देऊन आपापल्या मनास प्रशस्त वाटेल त्या रीतीनें आपल्या हयातींत आपल्या हातून होईल तेवढें देशकार्य करण्याचा निश्चय केला आहे, त्यांचे विचार सर्वांशीं न जुळणें व ज्याला त्याला प्रसंगविशेषीं आपापल्या विचारांचा पराकाष्ठेचा अभिमान उत्पन्न होऊन, एकदां उभयतांनीं आरंभिलेल्या सामान्य गोष्टीस अमरण चिकटून राहणें स्वतःस किंवा इतरांस सुखास्पद व कल्याणप्रद होणार नाहीं अशी खात्री झाल्यामुळें, ज्याच्या मनास जी दिशा अत्यंत आक्रमणीय वाटेल ती त्यानें धरणें,

यांत नवल वाटण्यासारखे काय आहे हें आम्हांस समजत नाहीं.' व्यक्तीच्या पत्रिकेंत एकमेकांकडे वक्र दृष्टीनें पाहणारे ग्रह आकाशांत त्याची शोभाच वाढवितात, स्वर्ग पृथ्वीच्या आटोक्याबाहेर नाहीं हें सिद्ध करण्याकरितां अहमहमिकेनें उंच होणाऱ्या समान्तर टेकड्यां-मधील जमीन अधिक सुपीक होते, ईश्वरप्राप्तीला ज्ञानमार्गाइतकाच भक्तिमार्गहि उपयुक्त असतो, या गोष्टी ध्यानांत आणल्या, म्हणजे आगरकरांनीं केलेला हा विचारकलह देशहिताच्या दृष्टीनें अत्यंत इष्ट होता असेंच प्रत्येकाला कबूल करावें लागेल.

# प्रकरण चवथें

## सुधारकाचा संसार

'प्रतिपक्षाच्या धमकावण्यांना भिऊन कोण स्वस्थ बसणार? सुधारक अं! टांकांतून अर्थबोधक अक्षरें काढण्याचें सामर्थ्य असेल व तीं वाचण्यास एक इसम तरी तयार असेल तोंपर्यंत तरी हें स्त्रैणकर्म सुधारकास स्पर्श करूं शकणार नाहीं.' आगरकरांचे हे तेजस्वी उद्गार वाचून पावनखिंडींत मूठभर मावळ्यांच्या मदतीनें सिद्दीच्या सेनासमुद्राला तोंड द्यावयाला तयार झालेल्या बाजीप्रभूची आठवण होते. चक्रव्यूहांत सांपडलेल्या अभिमन्यूची निधडी छाती, पुरंदरावर शिर उडून गेलें तरी यवनांचा समाचार घेत राहणारें मुरारबाजीचें कबंध, इत्यादि रोमहर्षण व अद्भुतरम्य दृश्यें सध्यांच्या नीरस काळांत दिसत नसलीं तरी, त्या धैर्याची व धाडसाची कल्पना आगरकरांच्या वीरगर्जनेवरून निःसंशय येते. केसरींत राजकीय व इतर विषयांवर ते लेख लिहीत राहिले असते तर लोकप्रियतेची लक्ष्मी त्यांचे चरण चुरीत राहिली असती पण सुखसमुद्रांत विष्णुप्रमाणें झोंप घेत पडण्याकरतां ते जन्मालाच आले नव्हते. शंकराप्रमाणें सत्याच्या हिमालयाचें अत्युच्च शिखर गांठणें, नवविचारांची गंगा आपल्या मस्तकावर घेऊन दग्ध देशबांधवांचा उद्धार करण्याकरतां तिचा प्रवाह वाहावयाला लावणें, समाजाला छळणाऱ्या रूढींना जाळून त्यांचे चिताभस्म अंगाला लावणें, इत्यादि कार्याकरितां त्यांचा जन्म होता. विष्णु पत्नीला पाय चुरावयाला लावतो. शंकर 'अर्धनारीनटेश्वर' म्हणवून घेण्यांत आनंद मानून पार्वतीला अर्धांग अर्पण करतो. वडवानल आणि नक्र यांनीं सासऱ्याचें अंतःकरण परिपूर्ण आहे हें माहीत असूनहि विष्णु त्याचा

पाहुणचार घेत राहतो. दक्षासारख्या पराक्रमी सासऱ्याचा अपराध पाहतांच शंकर त्याचा शिरच्छेद करायला मागेंपुढें पहात नाहीं. तत्कालीन प्रवाहपतित लोक व आगरकर यांच्यांत विष्णु व शंकर यांच्याइतकेंच अंतर होतें.

केसरीच्याद्वारें सामाजिक विषयांवरील आपलीं मतें साविस्तर, परिणामकारक व निर्भीड रीतीनें मांडणें अशक्य आहे अशी खात्री पटतांच आगरकरांनीं 'सुधारक' काढला. आपणाला लोकगंगेच्या प्रवाहाविरुद्ध पोहायचें आहे हें त्यांना कळत नव्हतें असें नाहीं. पण प्रवाहाबरोबर वहात जाणें म्हणजे विनाशाच्या सागराकडे आपण होऊन धांव घेणें आहे, असें त्यांची विवेकबुद्धि त्यांना सांगत होती. स्वतःची प्रकृति अशक्त; दम्यामुळें नव्या वर्तमानपत्राचा प्रचार करण्याकरतां बाहेरगांवीं जाणें सर्वथैव अशक्य. पण सूर्य कितीहि अभ्राच्छादित झाला तरी त्याचें तेज चंद्रापेक्षां अधिकच असतें. मोठ्या माणसांच्या बाबतींत हाच नियम प्रत्ययाला येतो. समाजाला पदोपदीं दंश करणाऱ्या रूढिरूपी नागिणीचे दांत पाडायला दम्यानें पीडलेले आगरकर मोठ्या उत्साहानें पुढें सरसावले. मनुष्यबळ नाहीं, पैशाचें पाठबळ नाहीं, लोकप्रियतेची आशा नाहीं; फक्त एक गोष्ट होती. ती म्हणजे अंतःकरणांत प्रकाशणाऱ्या सत्यसूर्याची प्रभा! ते सुधारक काढणार असें दिसतांच प्रतिपक्षानें 'याद राखा; आम्ही तुम्हांला सळो का पळो करून सोडूं' अशी धमकी दिली. आगरकरांची स्फूर्ति कांहीं शेणामेणाची नव्हती. त्यांनीं उत्तर दिलें' 'ठीक आहे. कोण कुणाला सळो का पळो करावयाला लावतो तें लवकरच दिसेल.'

१८८८–८९ या पहिल्या वर्षीं खर्चवेंच वजा जातां सुधारकांत तीस रुपये फायदा उरला! आगरकरांसारख्या खंद्या संपादकाला

मासिक वेतन महिना तीन रुपयांपेक्षांहि कमी पडलें. पण त्यांना त्याची क्षितीच नव्हती. पोटासाठीं त्यांनीं वर्तमानपत्र थोडेंच सुरू केलें होतें! चहाच्या झाडाप्रमाणें आचारवृक्षाची कालान्तरानें खच्ची करावी लागते, नाहींतर पुढील पीक चांगलें येत नाहीं. हें खच्ची करण्याचें काम त्यांनीं आपल्याकडे घेतलें होतें. पुरुषांचा मुकटा व बायकांचीं जाकिटें, मुलामुलींचें शिक्षण, स्वयंवर व घटस्फोट, आकाशांतलें सूर्याचें व पृथ्वीवरील धर्माचें ग्रहण, हे सर्व लहानमोठे विषय त्यांच्या लेखणीच्या कक्षेंत आले. विचारजागृति हेंच त्यांचें मुख्य ध्येय होतें. उन्ह व पाऊस यांच्यामुळें दगडांतदेखील बदल होतो; पण परिस्थिति व पारतंत्र्य या दोन्हींचा आमच्या आचारविचारांवर म्हणण्यासारखा काहींच परिणाम झाला नाहीं, हें शल्य त्यांना फार बोंचें. 'जो तो अस्तित्वांत असलेल्या लोकमतापुढें जाण्यास भिईल तर त्यांत बदल व्हावा कसा?' हा त्यांचा मुख्य प्रश्न होता. वेदांचा अर्थ हजारांपैकीं एकालाहि कळत नसला तरी, पिनलकोडापेक्षांहि वेदवाक्य प्रत्येकानें प्रमाण मानलेंच पाहिजे; व्यवहारांत पाण्याचें भांडें हातानें उचलून पाणी तोंडानें पिणें आवश्यक असलें तरी, ईश्वराचें तोंड जे ब्राह्मण त्यांनीं त्याच ईश्वराचे हात जे क्षत्रीय त्यांचा स्पर्श झालेलें पाणी पिणें हा अधर्म; महारमांग थंडीमध्यें कुडकुडत असले तरी, त्यांची काळजी न करतां, गांवच्या देवाला शेंकडों रुपये किंमतीचे कपडे आणि दागिने वहाणें ही ईश्वरभक्तीची पराकाष्ठा; घरांत बायको असतांना वेश्येचे उंबरठे झिजविणाऱ्या पुरुषाला समाजांत कुठेंहि बंदी नाहीं, पण बलात्कारानें पापपंकांत ढकलल्या गेलेल्या विधवेला मात्र दारांत उभें करायला कोणी तयार नाहीं; नवऱ्यानें बायकोचा रंग किंचित् काळा आहे म्हणून तिला टाकून दिली तरी तें स्वाभाविक, पण महारोगानें पीडलेल्या अगर महाव्यसनानें गांजलेल्या नवऱ्यालाहि प्रत्येक स्त्रीनें देव मानलाच पाहिजे;

सारांश, खरा धर्म पतीनें पत्नीवर, ब्राह्मणानें शूद्रावर, पुरुषानें स्त्रीवर, भिक्षुकानें भाविकांवर, धनिकानें निर्धनांवर अंमल गाजविण्यांत आहे, ही विषारी कल्पना अद्यापिहि पूर्णपणें निर्मूल झालेली नाहीं; मग तीन साडेतीन तपांपूर्वीं या कल्पनेचा समाजावर किती जबरदस्त पगडा असेल याची सहज कल्पना करतां येईल. आगरकरांना या कल्पनेचीं पाळेंमुळें खणून काढावयाचीं होतीं. त्यांच्या शिकवणीचें सविस्तर विवेचन पुढें केलेंच आहे; पण त्यांच्याच शब्दांनीं तिचें सार सांगायचें म्हटलें तर तें 'समाजाचें कुशल राहून त्यास अधिकाधिक उन्नतावस्था येण्यास जेवढीं बंधनें अपरिहार्य आहेत, तेवढीं कायम ठेवून बाकी सर्व गोष्टींत व्यक्तिमात्रास (पुरुषास व स्त्रीस) जितक्या स्वातंत्र्याचा उपभोग घेतां येईल तितका द्यावयाचा' असें सांगतां येईल.

आगरकरांनीं १८८८ सालीं 'सुधारक' काढला. सामाजिक सुधारणेविषयीं उदासीन असलेल्या लोकांना त्यांच्या पत्राची किंमत त्या वेळीं कळली नसली, तरी प्रत्येक खऱ्या समाज-हितचिंतकाला त्यांच्या या धैर्याचें कौतुकच वाटलें यांत संशय नाहीं. निर्भयपणानें सुधारक सुरू करण्याच्या त्यांच्या या प्रयत्नाचा हरिभाऊ आपटे यांनीं श्री. काशीताई कानिटकरांना लिहिलेल्या पत्रांत 'महात्म्याला शोभणारें कृत्य' असा गौरव केला आहे. कुत्र्याच्या अंगावरील गोचिडी भराभर काढायला गेलें तर प्रसंगीं कुत्रें चावा घेतल्याशिवाय रहात नाहीं, हें आगरकरहि जाणून होते. सुधारक चालविणें म्हणजे एक प्रकारची सुळावरली पोळी होती. सुधारणेच्या कल्पना आगरकरांच्या पूर्वीं महाराष्ट्राला अपरिचित होत्या असें नाहीं. लोकहितवादी, न्यायमूर्ती रानडे, डॉ. भांडारकर, विष्णुशास्त्री पण्डित वगैरे भिन्न भिन्न पुढाऱ्यांनीं लेखन, भाषण, वर्तन वगैरे विविध रीतींनीं सुधारणेचा गाडा शक्य तितका पुढें ढकलण्याचा प्रयत्न सुधारक निघण्यापूर्वींच केला होता. पण हे प्रयत्न मूठभर पगारवाल्यांचे आहेत, पुण्यामुंबईच्या

सुखवस्तु सुशिक्षितांनीं फावल्या वेळीं करण्याच्या या गोष्टी आहेत, समुद्राच्या वरच्या भागावर लाटा कितीहि नाचल्या तरी त्याचें अंतरंग शान्तच असतें, अशा या बाबतींत बहुजनसमाजाच्या समजुती होत्या. धैर्याच्या मंदाराचा मंथनदंड करून, रूढिरूपी वासुकीला रज्जूचें रूप देऊन, नवे विचार व जुनीं मतें या देवदानवांना मंथन करावयाला लावून, जनसमुद्र तळापासून घुसळून काढण्याचें सामर्थ्य सुधारक-कर्त्यांपूर्वीं दुसऱ्या कोणीहि दाखविलें नव्हतें. तत्त्वज्ञानाचा व्यासंग, अंतःकरणाची तळमळ, निर्भीड व आवेशपूर्ण भाषासरणी, इत्यादि सर्व गुण सामाजिक सुधारणेच्या शकटाला आगरकरांनीं जुंपले, तेव्हांच त्याची दृश्य अशी प्रगति झाली. सुधारकांतील निबंध आज वाचतांना, त्यांतील अनेक गोष्टी अंगवळणीं पडल्यामुळें आपल्याला तादृश महत्त्वाच्या वाटत नाहींत. आज युरोपला तीन आठवड्यांत गाद्या-गिरद्यांवर लोळत एखादा सामान्य मनुष्यहि जाऊं शकतो; म्हणून वास्को-डि-गामानें युरोपहून हिंदुस्थानाकडे येतांना जे हाल सोसले त्यांचें महत्त्व कांहीं कमी होत नाहीं.

'सुधारका'च्या द्वारें आगरकरांनीं वाग्यज्ञ आरंभिला आणि रूढि-सत्र सुरू केलें. सतत सात वर्षें हें सत्र सुरू होतें. जनमेजयाच्या सर्पसत्रांत तक्षकाला आसरा देण्याच्या पापामुळें इंद्राचाहि स्वाहाकार होण्याची जशी पाळी आली, त्याप्रमाणें दुष्ट रूढींना पोटाशीं कवटाळून धरणाऱ्या धर्मालाहि आगरकरांनीं या सत्रांत आपल्या लेखणीनें छेडलें. सुधारकांतील निवडक निबंधांचे जे तीन भाग प्रसिद्ध आहेत त्यांची नुसती अनुक्रमणिका चाळली तरी, समाजाची झोंपीं गेलेली विचारशक्ति जागृत करण्याचा आगरकरांनीं किती कसोशीनें प्रयत्न केला याची सहज कल्पना करतां येईल. हत्ती पहावयाला गेलेल्या आंधळ्याप्रमाणें धर्म नुसता चांचपून पाहूं नका, विवेकाची दृष्टि उघडा व त्याच्याकडे पहा, असा त्यांनीं जीव तोडून उपदेश केला. धर्म, अर्थ,

काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ संपादन करण्याकरतां मनुष्याचा जन्म असतो. यांतील पहिले तीन पुरुषार्थ ऐहिक व चवथा पारलौकिक आहे. बालविवाहानें दुर्बल झालेला, स्त्रीशिक्षणाच्या अभावीं अर्धांग लुळें पडलेला, जातिभेदाच्या जळवा लागून रक्तहीन झालेला समाज ऐहिक पुरुषार्थ कसे संपादन करणार? पायाच कच्चा असल्यावर कळसाकडे पहावयालाच नको.ऐहिक पुरुषार्थांच्या बाबतींत अपेशी ठरणारा समाज खऱ्या मोक्षाचाहि अधिकारी होत नाहीं. आगरकरांनीं शुष्क वेदान्त चोखींत बसलेल्या समाजाला आपल्या अंकुशानें टोंचून प्रगतीचा मार्ग दाखविला.

कडू औषधाप्रमाणें कटु सत्यहि कुणाला आवडत नाहीं. सुधारकांतून आगरकरांनीं वेळोवेळीं समाजाच्या अंतरंगाचे सत्यस्वरूप निर्भीड रीतीनें रेखाटल्यामुळें अनेक ढोंगी लोक चवताळून गेले. यापुढें लेखणी न आवराल तर प्राणाला मुकाल, अशा धमक्या देणारीं पत्रेंहि त्यांना आलीं. परंतु सारें जग विरुद्ध फिरलें तरी सत्य डगमगत नाहीं. आगरकरांनीं आपला निर्भीड लेख लिहिण्याचा व संध्याकाळीं फिरायला जाण्याचा नित्यक्रम तसाच चालू ठेवला. सुधारकाचे सहसंपादक असलेले गोखले व आगरकर त्या वेळीं एकाच वाड्यांत रहात असत. गोखल्यांनीं, थोडे दिवस एकटें फिरायला जाऊं नये, असा त्यांना सल्ला दिला. भटाप्रमाणें भित्रेपणालाहि ओसरी दिली कीं तो हातपाय पसरूं लागतो, हें पक्कें माहीत असल्यामुळें आगरकरांनीं तो सल्ला मुळींच ऐकला नाहीं. ठार मारण्याच्या धमक्यांनीं भागत नाहीं असें पाहिल्यावर शिमग्यांत त्यांची खोटीच प्रेतयात्रा काढण्याचें श्रेयहि कांहीं लोकांनीं घेतलें. खांदे दुखवून घेण्यापलीकडे बिचाऱ्यांना त्या उद्योगापासून अधिक कांहींच प्राप्ति झाली नाहीं. रणांगणावर जाणाऱ्या सैनिकाप्रमाणें आगरकरांनींहि तळहातावर आपलें शिर घेतलें होतें. स्वतःची प्रेतयात्रा बघण्याचें कुणालाहि न मिळणारें भाग्य आपल्याला लाभलें,

अशा विचारानें त्यांच्या विनोदी वृत्तीची, या प्रेतयात्रेनें, करमणूकच झाली असेल.

१८९० पासून त्यांचा दमा अधिक झाला. पण संमति-वयाच्या बिलाचा वाद, पंचहौद-मिशनच्या चहाच्या पेल्यांतून उत्पन्न झालेलें ग्रामण्याचें वादळ, वगैरे सर्व विषयांचा त्यांनीं यथास्थित परामर्ष घेतला. होळकर-सरकारनें देऊं केलेली पांचशें रुपयांची नोकरी नाकारून पूर्वींच्या स्वार्थत्यागावर त्यांनीं आतां कळस चढविला होता. १८९२ सालीं आपट्यांच्या मृत्यूनंतर ते फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपॉल झाले. कॉलेजची भरभराट होत होतीच. पण पुढें तीन वर्षांतच काळानें त्यांच्यावर झडप घातली. महापूर उपयुक्त वृक्षहि ज्याप्रमाणें उन्मळून टाकतों, त्याप्रमाणें मृत्यूहि मोठीं माणसें अवेळीं घेऊन जातो. स्वार्थत्याग, विद्वत्ता, समाजसेवा, इत्यादि गुणांची त्याला काडीइतकीहि किंमत वाटत नाहीं. दमा जसजसा वाढूं लागला, तसतसा आगरकरांना यकृताचा विकार जाणवूं लागला. पुढें त्यांतच उदराची भर पडली. त्या वेळीं आपलें आयुष्य देऊन आगरकरांचें आयुष्य वाढवितां येईल तर किती बरें होईल, असा विचारहि अनेकांच्या मनांत आला असेल. पण मृत्यूची नोकरी बदली देऊन कधींच होत नाहीं. महाराष्ट्राला रूढीच्या पाशांतून मुक्त करणाऱ्या या महावीरावर ता. १७ जून १८९५ रोजीं काळपाश पडले. सत्याचा निःसीम उपासक, विचार-स्वातंत्र्याचा दिव्यमंत्र महाराष्ट्राला सांगणारा महर्षि, विद्युल्लतेप्रमाणें अल्पकाळ चमकून लोप पावला !

— —

# प्रकरण पांचवें

## देव न मानणारा देवमाणूस

आगरकरांना अवघें एकूणचाळीस वर्षांचें आयुष्य देवानें दिलें. त्यांच्या आयुष्याची दोरी अकालीं तुटली तरी, कर्तृत्वाची पताका महाराष्ट्रांत चिरकाल फडकत राहील. एकूणचाळीस वर्षांच्या त्यांच्या आयुर्मानाचे स्वाभाविकच दोन विभाग पडतात. पहिला ज्ञानार्जनाचा व दुसरा ज्ञानदानाचा. फुलें, फळें व छाया यांनीं पांथांची सेवा करणारा निर्जन प्रदेशांतील वृक्षराज पाणी घालायला माळी नसतांनाहि जसा वाढतो, त्याप्रमाणें आगरकर मोठे पुरुष झाले. जन्मापासून दारिद्र्याच्या तापलेल्या वाळवंटांतून त्यांनीं प्रवास केला. एखादीदुसरी परीक्षा पास होतांच दुसरा कोणीहि दरिद्री मनुष्य आपल्या मागें लागला असता. पण अमृताकरितां धडपडणारे देव समुद्रानें दिलेल्या इतर रत्नांना जसे भुलले नाहींत, त्याप्रमाणें उच्च पदवी मिळेपर्यंत आगरकरांनींहि आपली चिकाटी सोडली नाहीं. विद्वान होण्याची त्यांची सात्विक महत्त्वाकांक्षा व ती साध्य करण्याकरितां त्यांनीं सोसलेले कष्ट दारिद्र्यपंकांत रुतलेल्या उपेक्षेच्या वणव्यांत होरपळून जाणाऱ्या, अथवा गाजरपारखी व स्वार्थ-साधु जगानें कःपदार्थ गणलेल्या जीवांना नेहमीं स्फूर्ति देत रहातील. पित्राज्ञेचें पालन करण्याकरितां प्रभु रामचंद्रानें चौदा वर्षें वनवास सोसला; पण त्यापेक्षांहि अधिक काल जिवाचें रान करून ज्ञान संपादण्यांत आगरकरांनीं घालविला. निग्रो लोकांना बुकर टी वॉशिंग्टनचें चरित्र जितकें स्फूर्तिदायक झालें, तितकेंच आगरकरांचें चरित्र महाराष्ट्रांतील गरीब विद्यार्थ्यांना उत्साहप्रद आहे.

रक्ताचें पाणी करून आगरकरांनीं जें ज्ञानधन मिळविलें तें कुणाकरतां ? वारा फुलांच्या सुगंधावर संतुष्ट राहून त्यांतील रस भ्रमरांना

देतो. पर्जन्यानें पृथ्वी आपला दाह तेवढा शान्त करून घेते, बाकी सर्व पाण्याचा उपयोग पिकांकडे करून ती प्राणिमात्राचें पोषण करतें. आगरकरांसारख्या स्वार्थत्यागी विद्वानांना या वायूची अगर पृथ्वीचीच उपमा शोभते. जग पैशाचें गुलाम आहे, हें पक्कें ठाऊक असूनहि; पैशाचा मोह झुगारून देणें ही कांहीं सामान्य गोष्ट नाहीं. पैसा हें मद्य आहे; परंतु सेवा हें अमृत आहे, हें दैवी तत्त्व आयुष्याच्या आरंभींच आचरणांत आणण्याचें सामर्थ्य फारच थोड्या लोकांच्या अंगीं असतें. कारकुनापासून कारभाऱ्यापर्यंत गिरणभाईपासून गिरणीवाल्यापर्यंत, हुजऱ्यापासून हुजुरापर्यंत, जगांत प्रत्येक मनुष्य एकच मनोराज्य करीत असतो. तें मनोराज्य म्हणजे जास्तींतजास्त पैसा मिळवायचा, टुमदार घर बांधावयाचें, बायकोला दागिन्यांनीं मढवून काढावयाची, मुलांना फुलासारखें वागवावयाचें, मुली आपल्यापेक्षां मातबर अशा घरीं द्यावयाच्या; सारांश, खूप पैसा मिळवायचा व तो अन्न, वस्त्र-अलंकार, घरदार, सणसमारंभ यामध्यें मोठ्या हौशीनें खर्च करावयाचा. अशा माणसाच्या कर्तुत्ववर्तुळाचा मी हा मध्यबिंदु व माझें कुटुंब ही त्रिज्या. गरिबी हात धुऊन पाठीमागें लागली असतांनाहि आगरकरांनीं या मळलेल्या मार्गाकडे ढुंकूनदेखील पाहिलें नाहीं. कोट्यवधि नक्षत्रें आकाशांत असलीं तरी जगाचे व्यवहार चालत नाहींत; सूर्य एकटा असूनहि नक्षत्रांना न साधणारे काम करूं शकतो. स्वार्थत्यागी महात्म्यांच्या बाबतींतहि हाच अनुभव येतो.

हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवणारे लोक जगांत हजारों असतात; पण स्वतःच्या घरावर तें ठेवणाऱ्या उदार मनाच्या विभूती केव्हांही विरळच असावयाच्या. अवघ्या तीस रुपयांवर आगरकरांनीं शाळेच्या कामाला स्वतःला वाहून घेतलें. शाळेला जसजशी सुस्थिति आली व पुढें कॉलेज निघून त्याची जसजशी भरभराट झाली, तसतशी आगरकर व त्यांचे सहकारी यांच्या पगारांत थोडी वाढ झाली

खरी. पण ती वाढ म्हणजे फुलाच्या एका पाकळीऐवजीं दोन मिळणें इतकीच होती. केसरी व सुधारक यांच्या संपादनापासून त्यांना कधींच कांहीं मिळालें नाहीं. आजचा केसरी सहस्रमुखांनीं वहाणाऱ्या गंगेप्रमाणें दिसत असला तरी उगमापाशीं त्याचा प्रवाह लहानच होता. सुधारक तर बोलून चालून बहुजनसमाजाच्या रूढ कल्पनांचा विच्छेद करण्यासाठीं काढलेलें पत्र ! खरी परंतु प्रतिकूल साक्ष देणाऱ्या मनुष्याप्रमाणें तें एका दृष्टीनें नेहमीं अप्रियच होतें ! आगरकरांनीं उघड्या डोळ्यांनीं हें सर्व पाहिलें; परंतु स्वीकृत मार्ग मात्र कधींहि सोडला नाहीं. शरीरापेक्षां प्राणांचें महत्त्व जसें अधिक, त्याप्रमाणें ऐहिक सुखोपभोगापेक्षां ध्येयाचें व सेवेचें सुख मोठें, हें आपल्या वर्तनानें सिद्ध करणारे जे थोडे पुरुष अर्वाचीन महाराष्ट्रांत झाले त्यांत आगरकर अग्रगण्य ठरतील.

कवाथा ( नारळाचा रोपा ) वाढून नारळ मिळायला वर्षेंच्यावर्षें जावीं लागतात. मानवी आयुष्याचेंहि तसेंच आहे. आगरकरांचीं पहिलीं चोवीस वर्षें आपल्या कर्तत्वमंदिराचा पाया घालण्यांत गेलीं. प्रत्यक्ष कार्याला त्यांना अवघीं पंधराच वर्षें मिळालीं. या पंधरा वर्षांचे दोन समान भाग होतात. १८८० ते १८८७ या पहिल्या भागांत न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेज या संस्थांची सेवा सहकाऱ्यांच्या जोडीनें करून, त्यांनीं केसरीचें संपादन केलें. या अवधींत त्यांना तुरुंग पहावा लागला व शेवटीं सामाजिक विषयांवरील मतभेदामुळें जीवश्चकंठश्च मित्रांचा व वर्तमानपत्राचा संबंधहि तोडावा लागला. १८८८ ते १८९५ या काळांत सुधारक वर्तमानपत्र काढून प्राणाहूनहि प्रिय असलेलीं मतें लोकांपुढें मांडण्याचें समाधान त्यांना मिळालें. दोन क्षुब्ध सागरांनीं गर्जना करीत एकमेकांवर चालून यावें व पर्वतप्राय लाटांच्या अनंत हस्तांनीं एकमेकांवर प्रहार करावेत, त्याप्रमाणें ‘ सुधारक ’ व ‘ केसरी ’ या दोन वृत्तपत्रांची त्या वेळची

झुंज वाटते. टिळक व आगरकर यांच्यामध्यें लेखण्यांचीं द्वंद्वयुद्धें सतत चालून ज्या ठिणग्या उडाल्या, त्या समाजाहिताच्या दृष्टीनें आवश्यकच होत्या काय, असा प्रश्न निःपक्षपाती मनुष्यापुढें वारंवार उभा राहतो. आगरकरांना केसरी व टिळकांना डेक्कन एज्युकेशन सोसायटी सोडावी लागली नसती तर या संस्थांनीं जें कार्य केलें त्यापेक्षांहि अधिक कार्य त्यांच्या हातून झालें असतें, असें आज कालप्रवाहांतून मान वर करून मागें वळून पाहिलें असतांना क्षणभर वाटतें. केवळ वकिलीच करायची म्हटली तर ती टिळक व आगरकर या दोघांचीहि करतां येईल. ज्याचें वकीलपत्र घेतलें असेल त्याच्या विरुद्ध बाजूच्या वैगुण्याच्या पराचा पारवा करणें हें कामहि कांहीं कठिण नाहीं. पण वर्तमानकाळ आंधळा असला तरी भविष्यकाळाला डोळस व्हावयाला मुळींच हरकत नसते. टिळक व आगरकर यांच्या मूर्ती केवळ कीर्तिरूपानें उरल्यानंतर त्यांच्या मतभेदाकडे व्यक्तीच्या अभिमानापेक्षां तत्त्वाच्या दृष्टीनें पहाणें हेंच समाजाचें कर्तव्य आहे. वसिष्ठ व विश्वामित्र यांच्या गोत्रांतील मंडळींनीं एकमेकांशीं भांडणें जितकें अप्रस्तुत, तितकेंच टिळक अगर आगरकर यांची बाजू घेऊन सध्यांच्या लोकांनीं विरुद्ध पक्षाच्या उखाळ्यापाखाळ्या काढणें अनुचित होईल.

कृष्ण व अर्जुन यांची मैत्री अलौकिक खरी; पण एकमेकांच्या गळ्यांत गळे घालणाऱ्या या नरनारायणांनाहि एकमेकांवर शस्त्र उपसायला लावणारा एक प्रसंग त्यांच्या आयुष्यांत घडून आलाच. टिळक-आगरकरांच्या चरित्रांत पुराणांतला कळलाव्या नारद दिसत नाहीं हें खरें आहे; पण नारदाची उणीव तत्कालीन समाजस्थितीनें भरून काढली. त्या वेळीं देश स्वतंत्र असता तर टिळक आगरकर झाले असते, अथवा समाज घातुक रूढींना झुगारून देण्याइतका विचारी असता तर आगरकर–टिळक झाले असते. या दोन्हीपैकीं एकहि गोष्ट त्या वेळीं नव्हती, हा कांहीं आगरकर-टिळकांचा

अपराध नव्हे. डाव्या व उजव्या या दोन्ही हातांचें मूळ मानेपाशीं एकमेकाजवळ असतें. पण बाहुपाशांत एखादा अवाढव्य पदार्थ धरण्याच्या वेळीं दोन्ही हात एकमेकांपासून शक्य तितके दूर जातात. तो पदार्थ पुरा पकडींत सांपडला म्हणजे परस्परविरुद्ध दिशेनें गेलेले दोन्ही बाहू पुन्हां संमीलित होतात. सामाजिक सुस्थिति व राजकीय स्वातंत्र्य या दोहींचें अपत्य असलेलें जें समाजसौख्य तें संपादन करण्यासाठीं, टिळक–आगरकरांना उजव्या व डाव्या हाताप्रमाणें एकमेकापासून दूर व्हावें लागलें. सुधारणावादी व स्वातंत्र्यवादी हे दोन्ही पक्ष सध्यां पूर्वीपेक्षां एकमेकांच्या जवळ आलेले दिसत आहेतच. डोळ्यांत तेल घालून बसलेलें परकी सरकार व विषम आणि अंध रूढी या दोन्हींच्या पाशांतून हिंदुस्थान ज्या दिवशीं मुक्त होईल, त्या दिवशीं या दोन्ही बाहूंचें प्रेमसंमेलन झालेलें दिसून येईल.

तत्त्वदृष्ट्या पाहिलें तर आगरकर काय किंवा टिळक काय दोघेहि स्वार्थत्यागाचे पुतळे होते. सूर्य व चंद्र यांच्यामध्यें येणाऱ्या पृथ्वीप्रमाणें सुधारणाविषयक मतभेद जर त्यांच्या आड आला नसता, तर त्यांच्या मैत्रीला ग्रहण लागल्याचा लोकांना जो भास झाला तो कधींच झाला नसता. मताचा अभिमान असावा परंतु अभिनिवेश असूं नये, असें सांगणें सोपें आहे; पण मतांसाठीं मृत्यूला कवटाळण्याइतकी मनाची तयारी व्हायला तीं मतेंहि मनांत अतिशय दृढमूल व्हावीं लागतात. जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं, आपलें प्रामाणिक मत दिसूं लागावें, तेव्हांच मनुष्याच्या हातून कांहीं तरी कृति होते. इंजिनांत आग पेटून पाण्याची वाफ होते तेव्हां आगगाडी चालते. टिळक-आगरकर या दोघांनींहि आपलीं मतें विचारपूर्वक पक्कीं केलीं होतीं. क्रियाशून्य मनुष्याला आपलें मत अंगावरील कपड्याप्रमाणें चटकन् बदलतां येतें; पण कर्तृत्ववान् मनुष्याचें मत म्हणजे त्याच्या अंगाचें कातडेंच ! या सर्व गोष्टी लक्षांत घेतां टिळक व आगरकर यांच्यांत जो विचार-

कलह उत्पन्न झाला तो आगीप्रमाणें अनर्थकारक वाटला तरी, लंडनच्या मोठ्या आगीनें त्या शहरांतील सर्व घाण जाळून टाकून त्याला नवें सुंदर रूप देण्याचे कामीं जशी पर्यायानें मदत केली, त्याप्रमाणें महाराष्ट्राच्या विचारस्वातंत्र्याला झांकून टाकणाऱ्या पाचोळ्याचें भस्म करून या दोन विभूतींच्या मतभेदानें महाराष्ट्रावर उपकारच केला असें म्हणावयाला हरकत नाहीं.

दारिद्र्य हाच जन्माचा सोबती, समाज नवविचारांची चिकित्सा करण्याला पराङ्मुख, अशा स्थितींत आगरकरांनीं त्याला आपल्या लेखणीनें जागृत करण्यांत रक्ताचा थेंब न् थेंब आटविला. प्रकृतीच्या सबबीवर सामान्य माणसें साधीं कामें करावयाला महिनेच्या महिने लावतात. पण दम्यासारखा हाडवैरी उरावर पाय ठेऊन उभा असतांनाहि, आगरकरांच्या लेखनांत अगर स्पष्टोक्तींत कधींहि अंतर पडलें नाहीं. रूढीप्रमाणें स्वतःच्या या दम्याविरुद्धहि त्यांनीं जोराची मोहीम केली. पण दुर्दैवानें त्याच्यावर त्यांना तात्पुरता विजय देखील मिळवितां आला नाहीं. दम्यावर त्यांनीं इतकीं औषधें घेतलीं होतीं कीं, ' माझा कोठा म्हणजे जगांतील सर्व वनस्पतींचीं एक मात्राच बनली आहे ! माझ्या मरणानंतर जर कोणी तो कोठा संभाळून वाळवून ठेवला तर, कदाचित् हेमगर्भाच्या मात्रेप्रमाणें जगाला त्या मात्रेचाहि उपयोग होईल ' असें ते विनोदानें म्हणत असत. बुद्धिमान् मनुष्याच्या मेंदूप्रमाणें रोगी मनुष्याचा कोठाहि शास्त्रज्ञांना चकित करून सोडील यांत संशय नाहीं.

जीव घेणाऱ्या रोगापासूनहि घटकाभर करमणूक करून घेण्याची ही विनोदी वृत्ति आगरकरांच्या स्वभावांत सर्वत्र प्रतिबिंबित होत असे. एकदां महाबळेश्वराला आगरकर सहकुटुंब गेले होते. तेथें कै. गोविंदराव कानिटकरांनीं त्यांना स्वतःच्या चिरंजीवाबरोबर ' घोडा घोडा ' हा खेळ खेळतांना पाहिलें. प्रथम थोडा वेळ चिरंजीव घोडा व

वडील चाबुकस्वार होते. पण समतेचीं तत्त्वें प्रतिपादन करणाऱ्या आगरकरांचे चिरंजीव सारा वेळ घोडा व्हावयाला थोडेच तयार होणार ! त्यांना स्वार होण्याची हुक्की आली व त्यांनी वडिलांना घोडा बनविलें. वडील या रूपान्तराला तयार होते; पण दम्यामुळें त्यांची चाल हरदासी तट्टासारखी होऊं लागली. चिरंजीवांना वडिलांचा हा चुकारतट्टूपणा पसंत पडला नाहीं. त्यांनीं तत्काळ घोड्याच्या पाठीवर कोरडा उडविला. या वेळीं आगरकर हंसून कानिटकरांना म्हणाले, ' सामाजिक सुधारणा घोड्याच्या धांवेप्रमाणें लवकर अंमलांत याव्या म्हणून मी लोकांना शब्दांचे चाबूक मारतों, आणि त्याची प्रतिकृतीच हा यशवन्त माझ्या पाठीवर करीत आहे. ' प्रौढत्वांतहि बालवृत्ति कायम ठेवणें हें कवींनाच साधतें, असें केशवसुत म्हणतात. आगर-करांची वरील गोष्ट वाचली म्हणजे त्यांचें अंतःकरण कवीचें होतें याची सहज साक्ष पटते.

आपल्या पत्नीविषयीं ते मोठ्या प्रेमानें व विनोदानें बोलत, असें कानिटकरांनीं आपल्या आठवणींत सांगितलें आहे. ' रूढ धर्माचारां-तील आणि लोकाचारांतील व्यंगांचें निर्भयपणें आविष्करण करण्याचें पाप हातून घडत असल्यामुळें, देशाभिमानी व धर्माभिमानी म्हण-विणाऱ्या पत्रांकडून होत असलेला भडिमार ज्याला व ज्याच्या निरपराव स्त्रीला एकसारखा सोसावा लागत आहे.' या त्यांच्या एका निबंधांतील उद्गारावरून आपल्याला मूक साहाय्य करणाऱ्या पत्नीविषयीं त्यांच्या अंतःकरणांत किती निर्मळ प्रेम वसत होतें, याची थोडी तरी कल्पना त्यांच्या वाचकांना खास आली असेल. रमाबाई रानड्यांप्रमाणें श्री. यशोदाबाई आगरकर जर आपल्या पतीच्या आठवणी लिहूं शकल्या असत्या तर आगरकरांच्या आयुष्यक्रमाविषयीं कितीतरी जिज्ञासा तृप्त झाली असती ! पण तें घडून आलें नाहीं. पत्नीला लग्नापूर्वीं अक्षर-

ओळख नव्हती, पण आगरकरांनीं तिला लिहायलावाचायला शिकविलें. त्यांना दोन मुलगे व एक मुलगी अशीं तीन अपत्यें होतीं. मुलगी त्यांच्या मृत्यूनंतर कांहीं काळानें वारली.

कांहीं सुधारकबुवांच्या उच्छृंखल वर्तनानें ' सुधारक ' या शब्दाचा त्या वेळीं ' फॅशनेबल ' गृहस्थ अगर गांवठी साहेब असा अर्थ होत असे. सुधारणेचा वारू चौखूर उडवीत जाणाऱ्या आगरकरांचा पोषाख अगदीं नवथर असला पाहिजे अशा समजुतीनें त्यांना भेटायला आलेल्या एका मनुष्याची एकदां चांगलीच निराशा झाली. ' स्त्रियांनीं जाकिटें घातलींच पाहिजेत ' हा आगरकरांचा लेख त्यानें वाचला होता. स्त्रियांच्या जाकिटांबद्दल अट्टाहास करणारा गृहस्थ घरीं सुटाबुटांतच असणार अशी त्याची ठाम समजूत होती. आगरकरांच्या घराजवळ असलेल्या एका स्वतंत्र खोलींत, धाबळीची बाराबंदी अंगांत घातली आहे, एक पंचा नेसून दुसरा डोक्याला गुंडाळला आहे, हातांत चिलीम असून तिचें सेवन चाललें आहे, अशा थाटाची एक मूर्ति त्यानें पाहिली त्यानें विचारलें 'आगरकर कुठें आहेत ?' चिलीम ओढणाऱ्या गृहस्थांनीं चौकशी केली, , त्यांच्याशीं आपलें काय काम आहे ? ' तो नवखा गृहस्थ उत्तरला, ' त्यांची कीर्ति ऐकून त्यांना भेटण्याकरितां मी आलों आहे. ' पंचा नेसलेल्या व चिलीम ओढीत बसलेल्या त्या गृहस्थांनीं ' मीच आगरकर ' म्हणून सांगितल्याबरोबर, मोठ्या जिज्ञासेनें त्यांना पाहण्याकरतां आलेल्या त्या गृहस्थाचा चेहरा फोटो घेण्यासारखा झाला असेल यांत संशय नाहीं. देवाप्रमाणें सुधारणेलाहि भाव पाहिजे; निव्वळ टिळे-टोपी-माळा म्हणजे जसें देवपूजेचें ढोंग, त्याप्रमाणें नुसता नवथर पोशाख म्हणजे सुधारणेची थट्टा. आगरकर हें पूर्णपणें ओळखून होते. त्यांची साधी रहाणी हें सुधारणेला नवे चोचले म्हणणाऱ्या लोकांचें तोंड बंद करणारें उत्तरच होतें !

तत्त्वपालन हाच धर्म हें ध्येय पुढें ठेवणाऱ्या मनुष्याचें वर्तन प्रसंगीं कठोर दिसलें तरी सुसंगत असतें.* वडिलांच्या मृत्यूनंतर आगरकरांनीं क्षौर करून घेण्याचें नाकारलें. 'मेलेल्या बापाच्या मुलांच्या मिशांशीं अर्थाअर्थी काय संबंध आहे?' या त्यांच्या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर कोणीहि देऊं शकला नाहीं. त्यांचे आप्त त्यांच्यावर रागावले; पण गोपाळरावांनीं तो रोष आनंदानें सहन केला. एका शिक्षणसंस्थेला वाहून घेतल्यामुळें त्यांचें मासिक उत्पन्न अत्यंत मर्यादित होतें; पण सुग्रण गृहिणीप्रमाणें ते या मर्यादित उत्पन्नांतच सर्व संसार चालवीत असत. दुसऱ्यापुढें पैशाकरितां कधींहि तोंड वेंगाडण्याची पाळी यऊं नये, किंबहुना आपल्यापासून दुसऱ्याला कोणत्याहि प्रकारचा उपसर्ग होऊं नये, याबद्दल ते नेहमीं काळजी घेत. मरणोत्तर त्यांच्या सामान-सुमानाची व्यवस्था करीत असतांना त्यांच्या पेटींत गोपाळराव गोखल्यांना रुपयांची एक पुरचुंडी सांपडली. 'माझ्या प्रेतदहनार्थ' अशी चिठ्ठी त्या पुरचुंडीवर होती. व्यवहारपटु म्हणून मिरविणारांची दूरदृष्टीहि इतक्या लांबवर पोंचणार नाहीं!

भावनाप्रधान मनुष्य उत्साहपूर्ण असतो व उत्साह उतावळा असतो हा तर नित्याचा अनुभव आहे. आगरकरांचा स्वभावहि असाच उतावळा असे. ज्याला छक्केपंजे स्वप्नांतहि माहीत नाहींत असा मनुष्य एखादी गोष्ट केव्हां करणें योग्य, याचा मुत्सद्याप्रमाणें विचार करीत बसलो कशाला? प्रो. कर्वे यांचा पुनर्विवाह ठरल्याचें कळतांच, आगरकर जवळजवळ धांवतच ते बसले होते त्या जागीं गेले व तेथें त्यांनीं त्यांचें अत्यंत उत्साहानें अभिनंदन केलें. न्यू स्कूलचे सुपरिंटेंडन्ट असतांना एका वर्गाचे शिक्षक शिकवितांना चुकत आहेत असें आगरकरांना वाटलें. मेघांतून पर्जन्याच्या धारा पडूं लागल्या कीं त्यांना

* कै. महाजनींच्या आठवणींप्रमाणें आईच्या मृत्यूनंतर असें दिसतें.

पृथ्वी गांठायला कितीसा वेळ लागतो ? चूक आगरकरांच्या लक्षांत येण्याचा अवकाश, तत्काळ वर्गांत जाऊन त्यांनीं ती दुरुस्त केली. मग मात्र अशा रीतीनें चूक दुरुस्त करण्यांत आपण चूक केली, शिक्षकाचें वैगुण्य मुलांच्यासमोर दाखविणें योग्य नव्हे असें त्यांना वाटूं लागलें. उतावळा मनुष्य जितक्या लवकर टाकून बोलतो, तितक्याच लवकर आपली चूक असेल तर तो न संकोचतां क्षमाहि मागतो. आगरकरांनीं शाळा सुटल्यावर त्या शिक्षकांना बोलावून आणलें व 'वर्गांत मुलांच्यादेखत तुमचा पाणउतारा करणें अगदीं अयोग्य, याबद्दल तुम्ही राग मानूं नये' अशा शब्दांनीं आपल्या चुकीचें परिमार्जन केलें. एवढा मनाचा मोठेपणा अधिकाराच्या जागे-वरील कितीसे लोक जगांत दाखवीत असतील ?

'काळी पगडी, बहुतकरून पांढरा आंगरखा, शुभ्र कांठाचें उपरणें आणि पायांत ब्राह्मणी चढाऊ जोडा' अशा साध्या वेषानें वावरणारे आगरकर जितके कट्टे सुधारक होते तितकेच मर्मज्ञ रसिक होते. सुधारकामध्यें 'काव्य, कविता व काव्यरति' या विषयांवर त्यांनीं लेख लिहिले आहेत. खाजगी बैठकींतहि त्यांची विनोदीवृत्ति व काव्यशक्ति उत्कृष्ट रीतीनें प्रगट होई. कानिटकर आपल्या आठ-वणींत म्हणतात, 'दाजीसाहेब बापट, मी व आगरकर यांच्या जेव्हां जेव्हां बैठकी होत तेव्हां तेव्हां आगरकरांच्या विनोदी भाषणामुळें व त्यांच्या आनंदी, उत्साही स्वभावामुळें आमच्या गप्पांना मोठा रंग येत असे. त्या वेळीं काव्य, स्त्रीपुरुषांचा वैवाहिक संबंध, शेक्सपिअरचीं नाटकें, स्त्रीशिक्षण, क्रॉफर्ड-प्रकरण, सिजविकचे, मिलचे व हर्बर्ट स्पेन्सरचे ग्रंथ व कँटची पॉझिटिव्ह फिलॉसफी वगैरे विषयांवर मारून खल चालावयाचा.'

रूढ धर्मग्रंथ व रूढ देव यांच्यावर आगरकरांची मुळींच श्रद्धा नव्हती. एका मित्रानें त्यांना 'सध्यां मी भागवताचें पारायण करतों'

म्हणून सांगितल्याबरोबर ‘ गिबनचें पारायण करा ’ म्हणून आगरकरांनीं त्याला सल्ला दिला. भावार्थ हा कीं, भागवतांतील रासक्रीडेच्या वर्णनापेक्षां गिबननें रोमच्या ऱ्हासाचीं दिलेलीं कारणें तुम्हांला सद्यःस्थितींत अधिक मार्गदर्शक होतील. गोपाळराव अज्ञेयवादी होते हें खरें असलें तरी, मानवी जीवनाचें पावित्र्य ओळखणारा, ‘ अनाथांची सेवा पावे झणीं देवा ’ हें तत्त्व शिरसावंद्य मानणारा, संपत्तीपेक्षां समाजाच्या सेवेची, स्वतःच्या बडेजावीपेक्षां आपल्या देशबंधूंच्या सुखाची किंमत अधिक आहे हें जाणून त्याप्रमाणें वागणारा त्यांच्यासारखा मनुष्य, देवळांतील देवाच्यापुढें दररोज नाक घासणाऱ्या कोट्यवधि माणसांत एक तरी असेल कीं नाहीं याची शंकाच आहे. गोपाळरावांचा देव आकाशांत, भव्य देवाल्यांत अगर घरच्या देव्हाऱ्यांत नव्हता; तो महाराष्ट्रांतल्या प्रत्येक मनुष्यांत त्यांना दिसत होता. लक्षावधि माणसांच्या हृदयांतील देव समाजाच्या उपेक्षेमुळें, जुलमामुळें व आंधळेपणामुळें धाई धाई रडत होता. या लक्षावधि अनाथांच्या हृदयमंदिरांतील ईश्वराची पूजा, स्वतःचा जीव त्यांच्यावरून ओंवाळून टाकून आगरकरांनीं केली. लांकडी बाहुलीला पोटाशीं धरून तिच्यावर पान्ह्याचा वर्षाव करावयाचा व भुकेमुळें मरणाऱ्या हाडामांसाच्या मुलाला लाथेनें दूर ढकलायचें याला मातृप्रेम कोण म्हणेल ? त्या वेळच्या महाराष्ट्राची देवभक्ति याच मासल्याची होती. लांकडी बाहुली दूर फेंकून टाहो फोडणारें मूल पोटाशीं धरा, असा स्पष्ट संदेश आगरकरांनीं प्रत्येकाच्या मनांतल्या माउलीला दिला. भक्तीची परमावधि याला नाहीं तर दुसऱ्या कशाला म्हणायचें ?

— — —

# आगरकर-चरित्र

## उत्तरार्ध

## प्रकरण पहिलें

### वाङ्मय-संसार,

शुद्ध कसें लिहावें हें व्याकरण शिकल्यानें समजतें असें आमिष व्याकरणाला मुलांनीं किराइताचा काढा मानून कंटाळूं नये म्हणून, व्याकरणाच्या आरंभीं दाखविलें जातें. मानवी जीवित हें जर निव्वळ नियमबद्ध व्याकरण असतें तर केवळ शुद्ध लिहिणारे लेखक मानव-जातीचे उपकारकर्ते ठरले असते ! पण संमिश्र संसार हें व्याकरण नसून काव्य आहे, तो गणित नसून इतिहास आहे. यामुळेंच नुसत्या शुद्धलेखनांत प्रवीण असलेले लेखक उंसाच्या वाडापेक्षां लोकांना फारसे अधिक आवडत नाहींत. विष्णुशास्त्री चिपळूणकरांपूर्वीं बालबोध थाटानें आपला वाङ्मयसंसार मंडित करणाऱ्या लेखकांची संख्या फार मोठी होती. औपचारिक बोलण्याप्रमाणें त्यांचें लिहिणेंहि लोकांच्या हृदयाला हात घालूं शकलें नाहीं. वाचकांच्या बुद्धीला दिपवील, हृदयाला हालवील, कल्पनेला रिझवील अगर सौंदर्यदृष्टीला रमवील असें स्वतंत्र मराठी लेखन थोरल्या शास्त्रीबोवांनींच प्रथम केलें. वाचकांत स्फूर्ति उसळावी अशी इच्छा करणाराच्या अंतःकरणांत भावनांचें वादळ नसेल, तर त्याची ती इच्छा तृप्त कशी होणार ? ‘ जाळावांचून

कढ नाहीं आणि मायेवांचून रड नाहीं ' ही म्हण लेखकांच्या बाबतींतहि पूर्णपणें प्रत्ययाला येते.

समाजाची दुःस्थिति पाहून आगरकरांचें अंतःकरण तिळतिळ तुटत होतें; म्हणूनच त्यांच्या लेखणींतून स्पष्टोक्तीनें भरलेले व आवेशानें रसरसलेले लेख बाहेर पडले. विष्णुशास्त्र्यांप्रमाणें आगरकरहि मोठे देशाभिमानी होते. शास्त्रीबोवांनी भाषा व देश यांविषयीं उदासीन बनलेल्या सुशिक्षितांच्या डोळ्यांत चरचरीत अंजन घातलें. आगरकरांनीं मेंढरांप्रमाणें गतानुगतिक होऊन रूढीच्या खड्ड्यांत जाऊन पडणाऱ्या लोकांवर कोरडे उडविले. ' लोकभ्रम ', ' आमच्या देशाची स्थिति ' वगैरे निबंध वगळले तर शास्त्रीबोवांचे इतर निबंध मुख्यतः वाङ्मयविषयकच आहेत. त्यांची भाषाशैलीहि अलंकारप्रचुर, डौलदार व पंडिती थाटाची आहे. त्यांच्या लेखनाची, वाङ्मयगुणांचीं रत्नें व देशाभिमानाचा वडवानल अंतरंगांत धारण करणाऱ्या सागराशीं तुलना करणें अयोग्य होणार नाहीं.

आगरकरांचें लिहिणें तसें नाहीं. तप्त झालेल्या पृथ्वीचें आक्रंदन ऐकून धांवत येणाऱ्या व पदोपदीं विजेच्या रूपानें आपलें जळणारें हृदय दाखविणाऱ्या मेघाप्रमाणें तें आहे. विष्णुशास्त्र्यांत पाण्डित्याचा प्रकर्ष वाचकाला आढळतो; आगरकरांत भावनांची भरती दृष्टीला पडते. शास्त्रीबोवांनीं आपले निबंध मासिकाकरितां व लोकशिक्षणाच्या उद्देशानें लिहिले; आगरकरांनीं वर्तमानपत्राकरतां व लोकजागृतीचा हेतु पुढें ठेवून ते लिहिले. स्वभावांप्रमाणें उद्देशांतहि असा फरक असल्यामुळें दोघांच्या लेखनाचें स्वरूप आमूलाग्र निराळें झालें आहे.

निबंधांखेरीज आगरकरांनीं तीन पुस्तकें लिहिलीं. पहिलें ' डोंगरीच्या तुरुंगांतील आमचे १०१ दिवस. ' वाईटांतून थोडें तरी चांगलें निघतें याचें हें पुस्तक म्हणजे एक उदाहरण आहे. आगरकरांवर तुरुंग-

वासाची पाळीच आली नसती तर, या पुस्तकांत तुरुंगाच्या सुधारणे-विषयीं त्यांनीं केलेल्या उपयुक्त सूचना त्यांच्या लेखणींतून बाहेर पडल्या नसत्या. दुसरें पुस्तक 'हॅम्लेट नाटकाचें भाषान्तर.' हें १८८३ त प्रसिद्ध झालें. 'हॅम्लेटचें पात्रच रंगवितांना भाषान्तरकारानें अनभिज्ञता दाखविली आहे' असा या भाषान्तराविषयीं ज्ञानकोशकारांचा अभिप्राय आहे. श्री. काशीताई कानिटकर यांनीं 'हरिभाऊंचीं पत्रें' या पुस्तकाला दोन शब्द लिहिले आहेत. त्यांतहि आगरकरांचें भाषान्तर न आवडल्यामुळेंच हरिभाऊ आपटे, गोविंदराव कानिटकर वगैरे मंडळींनीं दुसरें भाषान्तर करण्याचें ठरविलें असा उल्लेख आहे. या भाषान्तराला लिहिलेल्या प्रस्तावनेच्या शेवटीं खुद्द आगरकरांनींहि 'नाटकासारख्या विषयाकडे माझ्या मनाची स्वाभाविक प्रवृत्ति नाहीं' असे उद्गार काढले आहेत. या भाषान्तराच्या भाषेकडे पाहिलें तरी आगरकरांचा एरवींचा अस्खलित ओघ मधून मधून त्रुटित झाल्यासारखा वाटतो यांत संशय नाहीं. तिसरें पुस्तक 'वाक्यमीमांसा' हें त्यांनीं १८८८ सालीं प्रसिद्ध केलें. वाक्यांचें पृथक्करण व एकीकरण यांच्या नियमाविषयींचें हें व्याकरणविषयक पुस्तक विद्यार्थ्यांना उपयुक्त आहे. या तीन पुस्तकांशिवाय आगरकरांच्या नांवावर खालील पुस्तकें आढळतात : ( १ ) व ( २ ) केसरींतील निवडक निबंध, भा. १ व २, ( ३ ) विविधविषयसंग्रह ( ४ ) ( ५ ) ( ६ ) निबंधसंग्रह, भा. १ २ व ३. पहिल्या दोन पुस्तकांत ते केसरीचे संपादक असतांना त्यांनीं व त्यांच्या सहकाऱ्यांनीं लिहिलेल्या निबंधांचा संग्रह केला आहे. तिसऱ्या पुस्तकांत त्यांचे निरनिराळ्या विषयांवरील निबंध आहेत. बाकीच्या तीन पुस्तकांत त्यांचे सुधारकांतील सामाजिक, राजकीय व विविध निबंध संकलित करण्यांत आले आहेत.

या निबंधांतील मतें, विचारपद्धति वगैरे गोष्टींचा विचार पुढें सविस्तर केलाच आहे. येथें भाषाशैली व तत्सदृश इतर वाङ्मयगुण यांचेंच

निरीक्षण करावयाचें आहे. आगरकरांचीं वाक्यें सामान्यतः सुटसुटीत असतात. पण प्रतिपादनाच्या वेळीं मोटारप्रमाणें दिसणारीं त्यांचीं वाक्यें वर्णनाच्या प्रसंगीं आगगाडीचें स्वरूप धारण करतात. या आगगाडीचा प्रत्येक डबा म्हणजे एक पूर्ण वाक्य; प्रत्येक डबा मागच्या डब्याशीं अर्धविरामानें जोडलेला असतो; शेवटच्या डब्यांत बसलेला गार्ड व इंजिनांत बसलेला ड्रायव्हर यांच्यावर आगगाडीची हालचाल जशी पूर्णपणें अवलंबून असते, त्याप्रमाणें संबंधी सर्वनाम व दर्शक सर्वनाम या जोडीच्या साहाय्यानें ही वाक्यांची आगगाडी डौलानें मार्ग क्रमीत असते. उदाहरणार्थ, त्यांनीं केलेलें हिंदुस्थानचें वैभववर्णन पहावें. " सह्य, विंध्य व कैलास यांसारख्या प्रचंड पर्वतांनीं ज्याची तटबंदी झाली आहे; सिंधू, भागीरथी, नर्मदा, तापी, कृष्णा इत्यादि व नद्यांनीं ज्यांतील क्षेत्रें सिंचण्याचें व उतारूंचीं आणि व्यापाराचीं गलबतें व आगबोटी वहाण्याचें काम पतकरलें आहे; हिंदी महासागरानें ज्याला रशना होऊन शेंकडों बंदरें करून दिलीं आहेत; गुजरात, माळवा, बंगाल, वऱ्हाड, खानदेश इत्यादि सुपीक प्रान्तांनीं ज्यास हवें इतकें अन्नवस्त्र पुरविण्याची जबाबदारी घेतली आहे; ज्याच्या उदरांत कोठें ना कोठें तरी हवा तो खनिज पदार्थ पाहिजे तितका सांपडण्यास पंचाईत पडत नाहीं; ज्याच्या रानांत पृथ्वीवरील सर्व प्रकारच्या वनस्पति वाढत आहेत, व सर्व प्रकारचे पशुपक्षी संचार करीत आहेत; ज्यांत कोठें ऊष्ण कटिबंधांतली, कोठें शीत कटिबंधांतली व कोठें समशीतोष्ण कटिबंधांतली हवा खेळत आहे; सारांश ज्यांतील अत्यंत रमणीय प्रदेशांस ' अमरभूमि ' ' नंदनवन' ' इंद्रभुवन ' ' जगदुद्यान ' अशा संज्ञा प्राप्त झाल्या आहेत असा हा आमचा हिंदुस्थान देश आधिभौतिक संपत्तींत कोणत्याहि देशास हार जाईल किंवा यांतील सृष्ट पदार्थांचा चित्रपट दुसऱ्या कोणत्याहि देशाच्या चित्रपटापेक्षां कमी मनोरम ठरेल असें वाटत नाहीं. "

वरील वाक्य अनेक उंच कमानीवर उभारलेल्या भव्य पुलाप्रमाणें वाटतें. हिंददेशावर रचल्या जाणाऱ्या अनेक रडव्या गीतांपेक्षां या वाक्यांत भरतभूमीच्या निसर्गवैभवाचा स्वाभाविक अभिमान चांगल्या रीतीनें प्रगट झाला आहे. अशा प्रकारची रचना म्हणजे लांब पल्लयाची तोफ म्हणतां येईल. चिपळूणकरांच्या पाठोपाठ लिहूं लागलेल्या आगरकरांनीं तिचा उपयोग करून अनेक ठिकाणीं रूढिरूपी शत्रूचा धुव्वा उडविलेला आहे. तोरणाप्रमाणें भासणाऱ्या या वाक्यांच्याप्रमाणें संस्कृत शब्दांचा उपयोग करण्याचीहि आगरकरांना हौस आहे. अस्सल मराठी रचनेंतहि 'शाखावृत वृक्ष' भाषापरिज्ञानप्रवीण,' ' अनभिमतकाम,' ' सुष्टुतेचें पूर्णत्व ' ' सारतत्त्वरूप बावनकशी सोनें' ' क्रियाप्रवृत्तीचा प्रादुर्भाव,' सुधारकांची छलना ' ' पारतंत्र्यरूप गाढ अंधतमसांत ' वगैरे शब्दप्रयोग त्यांच्या लेखनांत आढळतात. आगरकरांचा काळ म्हणजे आधुनिक मराठीची बाल्यावस्था होती. यामुळें या बालिकेनें मधून मधून संस्कृत आजीकडे धांव घेणें सृष्टिस्वभावाला धरूनच होतें.

भाषाशैली हें लेखकाच्या अंतरंगाचें प्रतिबिंब असतें या तत्त्वाचा अनुभव आगरकरांचे निबंध वाचीत असतांना पदोपदीं येतो. स्वार्थपराङ्मुख मनुष्य सत्यप्रिय असतो, व सत्यप्रियता, तेजास्विता, सडेतोडपणा, तर्कशुद्ध विचारसरणी, विनोद इत्यादि गुणांना जन्म देते. सामाजिक विषयांवरील, त्यांचे सर्वच लेख ओजस्वी भाषेचे उत्कृष्ट नमुने आहेत. बालविवाहाचा प्रतिबंध करण्याचा कायदा झाल्यास आईबापांच्या हक्कावर गदा येईल या कल्पनेनें त्या कायद्याविरुद्ध ओरड करणारांना आगरकर विचारतात, ' दुसऱ्यास कुरूप करण्याचा हक्क ! पोटच्या पोरीचें कुंकू पुसण्याचा अधिकार ! मुलाच्या बायकोस नापिता

---

* या घाटाच्या वाक्याचीं उत्तम उदाहरणें ' आमचें ग्रहण अजून सुटलें नाहीं' या लेखाचा आरंभ व ' वल्लभोपासना ' या लेखाचा शेवट हीं आहेत.

पुढें बसविण्याचें स्वातंत्र्य ! असलें हक्क, असलें अधिकार, असलें स्वातंत्र्य राखण्याबद्दल अकाण्डताण्डव करणारांना हक्क, अधिकार व स्वातंत्र्य यांचा अर्थ व उपयोग मुळींच समजत नाहीं.' गेलीं दोन हजार वर्षें आम्ही सामाजिक व राजकीय गुलामगिरींत काढलीं, छत्रपतींसारखे अपवाद वगळले तर कोणत्याच क्षेत्रांत पराक्रम दाखविला नाहीं. याविषयीं ते म्हणतात, ' आमच्या शोचनीय राष्ट्रस्थितींत गेल्या दोन हजार वर्षांत म्हणण्यासारखा फेरफार झाला आहे असें बहुधा कोणाहि विचारी पुरुषास म्हणतां येणार नाहीं ! येथें रहाणाऱ्या पांच कोटि लोकांच्या जागीं दहा कोटि झाले असतील किंवा दहाचे जागीं वीस कोटि झाले असतील; सिथियन लोकांनीं आमची मानगुटी सोडली असेल तर ती इंग्रजांनीं धरली असेल; जेथें पूर्वीं जमिनीचा एक बिघा लागवडींत होता तेथें आतां तीन असतील, व जेथें पूर्वीं दहा खोपटीं होतीं तेथें आतां कदाचित् शंभर असतील; कधीं मुसलमानांपुढें घट्ट तुमान व लांब अंगरखा घालून कोंपरापासून सलाम करीत पळावें लागत असेल, तर कधीं पाटलूण व बूट चढवून आणि कोट घालून विलायतेच्या गोऱ्यांपुढें धावावें लागत असेल; पूर्वीं मर्जीविरुद्ध कर द्यावे लागत असले तर आतां कदाचित् ते कायद्यानें द्यावे लागत असतील; पूर्वींचे राज्यकर्ते उघड उघड पक्षपात करीत असले तर आतांचे कदाचित् न्यायाच्या पांघरुणाआड करीत असतील-पण असल्या स्थित्यंतरास स्थित्यंतर म्हणावें कीं नाहीं याचा आम्हास बराच संशय आहे.' अंधःकारानें व्यापलेल्या आकाशांत वीज जशी निर्भयपणें संचार करते, त्याप्रमाणें भ्याडपणा, अंधश्रद्धा, स्वतःची फसवणूक करून घेण्याची प्रवृत्ति इत्यादिकांच्या आहारीं गेलेल्या समाजाच्या सत्य स्वरुपावर आगरकरांनीं सडेतोडपणानें प्रकाश पाडला. टिळकांच्या राजकीय लेखांतील निर्भयपणा,

आवेश, स्वतंत्र बाणा हे सर्व गुण तितक्याच उत्कटतेनें आगरकरांच्या सामाजिक व इतर निबंधांत प्रकट झाले आहेत.

दुष्ट रूढींचें खंडन, आत्मवंचक समाजाच्या विसंगतपणाचें दिग्दर्शन हींच कामें आगरकरांना मुख्यतः करावयाचीं असल्यामुळें त्यांच्या निबंधांतील विनोद बहुधा उपहास अगर उपरोध यांपैकीं एखादें रूप धारण करतो. सामाजिक गोष्टींखेरीज बाकीच्या गोष्टींत सरकारच्या साहाय्याची याचना करणाऱ्या लोकांविषयीं ते म्हणतात, ‘ यांना जर लोकस्वातंत्र्याचें रहस्य इतकें समजलें आहे तर त्यांनीं असें नादान कर्म कां करावें ? ’ “ हे सरकारा, आम्ही गचाळ लोक आपण होऊन आपल्या धेनु कसायास विकतों; तेव्हां मेहेरबान होऊन गाई विकणारांस व त्या घेणारांस दंड कर. हे दयानिधे, इलाखाधिपते, आम्ही प्रतिदिवशीं मदिरापाशांत अधिकाधिक गुरफटत आहों; याकरितां दारू पिणारांचें व विकणारांचें शासन कर. हे सर्वश्रेष्ठा राज्ञीप्रतिनिधे, आम्ही पामर लोक अज्ञानतिमिरांत ठेंचा खात आहों, व्यापारधंदा बुडाल्यामुळें उपाशीं मरत आहों, नीतीचा लय झाल्यामुळें पतित होत आहों व धर्मभय सुटल्यामुळें पापनिधींत बुडतों आहों; याकरतां आमच्याकडून हवा तेवढा कर चोपून घे व हवे तसले प्रखर कायदे कर. ” हा उतारा वाचतांना शिवराम महादेव परांजपे यांच्या उपहासपूर्ण भाषाशैलीची आठवण झाल्यावांचून रहात नाहीं. विसंगतपणा हाच विनोदाचा आत्मा असल्यामुळें ‘ सोंवळ्याची मीमांसा ’ ‘ प्रेत–संस्कार ’ वगैरे लेखांत आगरकरांच्या उपहास, उपरोध वगैरे विनोद-गुणांना भरपूर वाव मिळाला आहे.

भर दुपारीं मनुष्याची छाया लोप पावल्यासारखी वाटली तरी ती त्याच्या पायांतच घुटमळत असते. रुक्ष विषयांतहि नैसर्गिक रसिकता अशीच, अल्प प्रमाणांत कां होईना, दृग्गोचर होते. जगांतल्या सर्व गोष्टी सदोष असायच्याच असें सांगतांना आगरकर म्हणतात,

'गुलाबाचें सुंदर फूल कांट्यांतून काढावें लागतें; मौक्तिकासाठीं समुद्रमज्जन करावें लागतें; सुवर्णकण मृत्कणाशीं मिसळलेले असतात; तात्पर्य काय कीं, येथली कोणतीहि वस्तु, संस्था, रीति किंवा स्थिति घ्या, तींत बिलकुल उणेपणा नाहीं असें कधींहि व्हावयाचें नाहीं.' बालविवाहाच्या दुष्परिणामाविषयीं त्यांचें खालील वाक्य जितकें तथ्यपूर्ण तितकेंच हृदयस्पर्शी आहे. 'दहाबारा वर्षांच्या पोरीस किंवा पंधरा सोळा वर्षांच्या पोरास संसाराचे विंचू लावण्यांत, ज्या कन्यांना ऋतुदेखील प्राप्त झाला नाहीं अशांस वैधव्याग्नीनें पोळण्यांत, अथवा एखादी जाईची कळी निवडुंगावर किंवा सोनचांपयाचें फूल कोरांटीवर आणून टाकण्यांत काय शहाणपणा व भूषण असेल तें असो!' मधून मधून अलंकारिक भाषेचा विलासहि आगरकरांच्या निबंधांत आढळतो. 'सुधारणा व कलह' या लेखाच्या आरंभीं समुद्रपर्यटन व जीवितक्रमण यांतील सविस्तर साम्य त्यांनीं सुंदर रीतीनें दाखविलें आहे. ग्रीष्मांतला सूर्य कितीहि प्रखर असला तरी त्याचें उदयास्तींचें बिंब जसें सौम्य, सुखकारक व सौंदर्यमय भासतें त्याप्रमाणें त्यांची आवेशपूर्ण भाषा अशा स्थळीं हृदयंगम व आनंद-दायक स्वरूप धारण करते.

'समाजाची स्थिति भरलेल्या गाड्यासारखी आहे. तो टपालाच्या टांग्याच्या वेगानें कधींहि जाऊं शकणार नाहीं.' 'भास्कराचार्यांचें भास्कराचार्यत्व वेधशाळेंत' (पुराणांतलीं वांगीं पुराणांत या प्रचलित संप्रदायाचें हें नवें सरस रूपान्तर आहे.) 'वृद्ध लोक समाजनौकेचे भरताड होत; तरुण शिडें होत! पहिल्याशिवाय समाजांत स्थिरता रहाणार नाहीं, दुसऱ्याशिवाय त्याला गति येणार नाहीं.' इत्यादि अल्पविस्तर पण अर्थपरिपूर्ण वाक्येंहि त्यांच्या निबंधांत विखुरलेलीं आहेत. आकारानें फार लहान पण किंमतीच्या दृष्टीनें अतिशय

मौल्यवान् असलेल्या हिऱ्याच्या खड्याप्रमाणें असलीं वाक्यें सरस्वतीची सुंदर भूषणेंच होत.

कलाविलास व विचारजागृति हे वाङ्मयाचे मुख्य दोन हेतु असतात. या दोन्ही हेतूंचा संगम उत्कृष्ट खरा; पण मध्यान्हींचा प्रखर सूर्य व पौर्णिमेचा शीतल चंद्र एका वेळीं दिसण्याइतकाच तो अशक्य आहे. एकाच वेळीं दोन पत्नींवर सारखेंच उत्कट प्रेम करणें सहृदय मनुष्याला जसें अशक्य, त्याप्रमाणें कलावन्ताला एकाच वेळीं कला व जागृति या दोन्हींची सारख्याच उत्कटतेनें उपासना करणें कठिण. या दोघी सवतीसवतींप्रमाणें वागतील असा याचा अर्थ नव्हे; पण सौन्दर्य व सत्य या दोघांचाहि पूर्ण उत्कर्ष एकाच लेखणींत झालेला क्वचित्च आढळतो. कला व्यक्तीकडे पहाते; जागृतीची नजर समाजावर खिळलेली असते. कल्पकता, भावना, सौन्दर्य व ध्येयवाद यांचे पंख लावून कला स्वर्गाकडे धांव घेत असते; जागृति, तर्क, स्पष्टोक्ति, व्यवहार व बुद्धि यांचे घोडे जुंपून आपला रथ पृथ्वीवरूनच हांकीत असते. जागृति-कारक लेखक हें वर्णन आगरकरांना सर्वथैव लागू पडणारें असल्यामुळें त्यांच्या निबंधांत कलेच्या लालित्याचा पूर्ण विकास आढळत नाहीं. भाषासौन्दर्य, कल्पनाप्राचुर्य, काव्यात्मता वगैरे वाङ्मयगुण श्री. कृ. कोल्हटकर, न. चिं. केळकर, वा. म. जोशी, रा. ग. गडकरी वगैरे लेखकांच्याइतके आगरकरांत सांपडत नाहींत. पण त्याच वेळीं हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, दृढमूल झालेल्या दुष्ट रूढि मुळांपासून हालविण्याचें सामर्थ्य, आवेशपूर्ण भाषेनें समाजाला खडबडून जागें करण्याची शक्ति, सत्याचा सूर्य तीव्र असला तरी त्याच्याकडे निश्चल दृष्टीनें पाहाण्याचें धैर्य, आगरकरांच्या इतकें इतर कलाकुशल लेखकांत सहसा आढळत नाहीं. ओज, आवेश, सत्यप्रीति, तळमळ, तर्कशुद्ध विचारसरणी, वगैरे आगरकरांचे गुण नवे लेखक आत्मसात् करतील तर त्यांच्या हातून समाजाची व वाङ्मयाची उत्कृष्ट सेवा होईल.

# प्रकरण दुसरें

## सामाजिक परिस्थिति

सामाजिक सुधारणा व स्त्रीजात या दोन्हींच्या बाबतींत आगरकरांच्या वेळचा समाज सर्वस्वीं उदासीन होता. पुण्या-मुंबईकडील मूठभर सुशिक्षित लोक स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह, वगैरेंच्या गोष्टीं बोलत असत. पण इंग्रजी विद्येचें मद्यप्राशन करून या लोकांनीं ही बडबड चालविली आहे, असाच त्यांच्या चळवळीविषयीं बहुजनसमाजाचा समज होता. अजूनहि खेडोंपाडीं 'सुधारणा' व 'सुधारक' हे दोन्हीं शब्द फार अप्रिय आहेत. स्वतःच्या चैनीसाठीं नवे नवे चार करणारा, धर्माला धाब्यावर बसवून स्वतःच्या सुखाकडे पहाणारा, सारांश, आकाशाच्या वरच्या भागांत नरक म्हणून जर एखादें स्थळ असेल तर त्याचें तिकीट काढून आयुष्याच्या आगगाडींत बसलेला मनुष्य, अशी सुधारकाची व्याख्या अशिक्षित समाजांत अद्यापीहि प्रचलित आहे. नव्या चालीरीति आपला अंमल गाजवूं लागल्या आहेत; पण कलियुग म्हणून त्यांच्यापुढें नाइलाजानें आपण मान वांकवीत आहों, अशी स्वतःची समजूत करून घेणारे हरीचे लाल आपल्या देशांत कोटींनीं मोजतां येतील. काळ फरफरा जेथें ओढीत नेईल, तिथें मनुष्याला गेलेंच पाहिजे असें म्हणून बिचारे उघड्या डोळ्यांनीं सर्व सुधारणा पहात असतात. त्या दृष्टीसमोर नको असल्या तर कायमचे डोळे मिटल्यावांचून त्या टाळण्याचा दुसरा मार्ग नाहीं, हें त्यांना पक्कें ठाऊक असतें ! अशारीतीनें जिवावर उदार होण्यापेक्षां उदारपणाचा आव आणून 'चालायचंच; कलियुगच आहे हें !' असें उद्गार काढण्यापलीकडे बापड्यांना कांहीं करतांच येत नाहीं.

आगरकरांच्या वेळीं, इंग्लिश समाजाचें अंधानुकरण करणारे गांवठी साहेब वगळल्यास, इतर लोक सुधारणेकडे निरनिराळ्या चार चष्म्यांतून पहात होते असें म्हणतां येईल. या चार प्रकारच्या लोकांपैकीं संख्येनें सर्वांत मोठा वर्ग अशिक्षित, रूढि म्हणजेच धर्म असें मानणारा, पापपुण्य व स्वर्ग नरक यांच्या कात्रींत विचारशक्तीच्या प्रत्यहीं चिंधड्या करून घेणारा व सामाजिक रोगांचीं मुळींच जाणीव नसलेला असा होता. या वर्गांत पुढारीपण जुनें तें सोनें मानणाऱ्या, इंग्रजी शिक्षणानें उत्पन्न होणारे नवे विचार विषवत् आहेत असें प्रतिपादन करणाऱ्या व सामान्यतः धर्मसिंधूपलीकडे ज्यांचें धर्माध्ययन गेलें नाहीं, अशा भटाभिक्षुकांच्या व शास्त्रीपुराणिकांच्या वर्गाकडे होतें. अशिक्षित व अंधश्रद्ध बहुजनसमाज धर्माचें पाणी याच ओंजळींनें पीत असल्यामुळें, त्याच्या सुधारणाविषयक कल्पना म्हणजे भटाभिक्षुकांच्या 'अब्रह्मण्यम्' चे नुसते प्रतिध्वनि होते. तिसऱ्या वर्गांत बहुतेक सर्व सुशिक्षित समाज होता. आपल्या सर्वच चालीरीति चांगल्या नाहींत, बापजाद्यांच्या बावींतलें पाणी नासलें तरी थोरांबाळांनीं तेंच प्यावें असें म्हणणें मूर्खपणाचें आहे, वगैरे गोष्टी त्याला कळत होत्या; पण निरनिराळ्या कारणामुळें हा वर्ग सामाजिक सुधारणेच्या प्रगतीच्या दृष्टीनें असून नसल्यासारखाच होता. या वर्गापैकीं कुणी 'आस्ते कदम' हा सल्ला देत, कुणी काळावर हवाला टाकीत, कुणी राजकीय नगारा वाजवून स्वातंत्र्य मिळवा आणि मग सामाजिक सुधारणेची टिमकी बडवीत बसा, असा कळकळीचा उपदेश करीत. आस्तेकदमवाल्यांचें ब्रीद 'लघुतमविरोधमार्ग' हें होतें. त्यांना समाज अजगरासारखा अत्यंत आळशी पण एखाद्यावर चिडला म्हणजे त्याला उभाच्या उभा गिळून टाकण्याला समर्थ असा वाटे. आज सुईनें भोंक पाडा, तें भोंक हळुहळू मोठें झालें म्हणजे तरवार देखील आंत जाईल अशी याची विचारसरणी असे. हे लोक सुधारणेच्या बाबतींत निदान

हातपाय हालविले पाहिजेत असें तरी म्हणत असत. दुसरे कित्येक इष्ट सुधारणा कालान्तरानें घडून येणार असा आशीर्वाद देऊन मोकळे होत. प्रवाहांत नौका घाला; शीड उभारूं नका, वल्हीं मारूं नका, इष्ट बंदराला तुम्ही आपोआप पोंचाल असें सांगण्यापैकींच हा गळ्याला वसलेला फांस आहे व सामाजिक दोष पोटांतील रोग आहे. आधीं गळफांस सोडवा व मग पोटांतल्या रोगाला महत्त्व द्याल तर, पोटांत औषध जायच्या आधींच शरीरांतून प्राण निघून जाईल. आगरकरांना हे तीनहि वर्ग नापसंत होते. अंध बहुजनसमाज, संकुचित मनाचे व रूढि हेंच परब्रह्म मानणारे जीर्णमतवादी व 'स्वातंत्र्य, स्वातंत्र्य' म्हणून जपमाळ घेणारे राजकीय पुढारी हे सर्व भयंकर सामाजिक रोगांची उपेक्षा करीत आहेत. राजकीय सुधारणेइतकीच सामाजिक सुधारणाहि आवश्यक आहे असें त्यांची मनोदेवता त्यांना सांगत होती. समाजांत विचारमूढता असूं नये, विचारकलह असावा, असें त्यांनीं वारंवार प्रतिपादन केलें आहे.

या चार वर्गांपैकीं आगरकरांना सगळ्यांत जवळ असा जर कोणता वर्ग असेल तर तो राजकीय सुधारणा आधीं करा असें म्हणणारा टिळक-पक्षच होय. हा पक्ष सुशिक्षित होता. देशासाठीं त्याचें अंतःकरण तळमळत होतें. मात्र दुःस्थितीच्या रोगावर स्वातंत्र्य हेंच रामबाण औषध आहे असें त्याचें म्हणणें होतें. 'न्हाणवलीचा शास्त्रदृष्ट्या विचार' हा सामाजिक लेख खुद्द टिळकांनीं १८८३ सालीं केसरींत लिहिला होता हें खरें; पण सामाजिक अन्याय हे पायाला टोंचणारे कांटे असले तर राजकीय पारतंत्र्य हें हृदयांत सलणारें शल्य त्याहे, आणि तें आधीं दूर केलें पाहिजे, अशी त्यांची व त्यांच्या अनुयायांची विचारसरणी होती. टिळक-चरित्रकार श्री. केळकर म्हणतात, 'आगरकरांचा मोठेपणा त्यांच्या विशिष्ट प्रकारच्या सामाजिक मतांमुळें होता ही गोष्ट टिळकांना